महाराष्ट्र विधानसभा

तिसरे अधिवेशन, २०२२

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

दापोली (जि.रत्नागिरी) तालुक्यातील पालगड या मुळगावी परमपुज्य सानेगुरुजी यांचे स्मारक उभारण्याबाबत

(१) १२०६२ (१६-०९-२०२०). श्री.योगेशदादा कदम (दापोली) : सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापोली (जि.रत्नागिरी) तालुक्यातील पालगड येथे परमपुज्य सानेगुरुजी यांचे भव्य स्मारक उभारण्याबाबत शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्तावाबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे व त्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. मंगलप्रभात लोढा (१२-१०-२०२२) : (१) होय.

(२) सदर प्रस्तावामधील प्रादेशिक पर्यटन विकास योजनेनुसार अनुज्ञेय असलेल्या "(१) प्रवेशद्वाराचे बांधकाम व (२) लँडस्केपिंग व फाऊंटेन या रु.३०.०० लक्षच्या कामांना पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय, दि. ०४.१.२०१७ अन्वये प्रशासकीय मान्यता देऊन रु.१०.०० लक्ष निधी जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांना वितरीत करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईत विशेषतः बीकेसी, अंधेरी आणि बोरिवली या परिसरातील हवा प्रदुषित असल्याबाबत

(२) १२७२२ (२०-०९-२०२०). श्री.सुनील राणे (बोरीवली) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत विशेषतः बीकेसी, अंधेरी आणि बोरिवली या परिसरातील माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान हवा प्रदूषित असल्याची नोंद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विकास कामांमुळे निर्माण होणाऱ्या प्रदूषणावर आळा घालण्यासाठी आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये पाच हजार रुपये दंड आकारण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निर्णयानुसार मुंबई महानगरपालिकेने यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१३-१०-२०२२) : (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या माहे जानेवारी, २०२० मधील वायु सर्वेक्षणाचा अहवालानुसार बीकेसी, अंधेरी व बोरीवली येथील वातावरणात तरंगणा-या धुळीकणांची सरासरी पातळी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने निर्धारीत केलेल्या मानकांच्या तुलनेत जास्त आढळून आले. मात्र ओझोन, कार्बन मोनॉक्साईड व नायट्रोजन डायऑक्साईड या घटकांचे प्रमाण कमी आढळून आले.

(२) व (३) हे खरे आहे.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने घेतलेल्या निर्णयाबाबतच्या सूचना बांद्रा-कुर्ला संकुल परिसरातील संबंधीत ठेकेदार / भूखंडधारक यांना देण्यात आलेल्या आहेत. सदर सूचनांचे पालन न करणा-या ठेकेदार / भूखंडधारक यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे जिल्ह्यातील पोषण आहार वाटपातील ठेकेदाराने नियमांचे व अटींचे उल्लंघन केल्याबाबत

(३) ३२३४७ (०१-०९-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील महापालिका व नगरपालिका हद्दीतील इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना शाळेत धान्याची मालवाहतूक करण्यासाठी मुंबई येथील महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह कंझ्युमर्स फेडरेशन लिमिटेड या संस्थेस ठेका देण्यात आला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुणे महानगरपालिकेच्या हडपसर येथील शाळा क्रमांक ५८ येथे माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान पशुखाद्याच्या कोंडीतून निकृष्ट दर्जाचा धान्यादी मालाचा पुरवठा केल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणाची प्राथमिक शिक्षण अधिकारी, पुणे जिल्हा परिषद व पुणे महापालिका शिक्षण मंडळाच्या प्रशासकीय अधिकारी यांच्या मार्फत चौकशी करण्यात आली असून, चौकशीतील पाहणी अहवालात पुरवठादाराने करारनाम्यातील नियमांची अंमलबजावणी केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी अन्न व औषध प्रशासनाच्या वतीने सदर धान्यादी मालाच्या दर्जाबाबत अहवाल सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, महापालिका व नगरपालिका हद्दीतील पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना पुरवण्यात आलेल्या निकृष्ट दर्जाच्या व मालाचे वजन कमी देणाऱ्या व धान्यादी माल वितरित करणाऱ्या पुरवठादारावर कारवाई करण्याबाबत तसेच सदर पुरवठादाराला काळया यादीत टाकणेबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिपक केसरकर (१९-१०-२०२२) :(१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) होय, हे खरे आहे.
(५) सदर प्रकरणी प्राथमिक शिक्षण संचालनालय स्तरावरुन त्रिस्तरीय समिती नेमून चौकशी करण्यात आली आहे. त्यानुसार संबंधित पुरवठेदारावर नियमानुसार दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई येथील चिंचपोकळी रेल्वे स्थानकावरील ब्रिटीशकालीन धोकादायक उड्डाणपुलावरून अवजड वाहनांची वाहतूक सुरु असल्याबाबत

(४) ३२४०१ (३०-०८-२०२१). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई येथील चिंचपोकळी रेल्वे स्थानकावरील ब्रिटीशकालीन उड्डाणपूल धोकादायक अवस्थेत असल्याने या उड्डाणपुलावरून बेस्ट वगळता इतर अवजड वाहनांच्या वाहतुकीस शासनाने प्रतिबंध केला असतानाही दिवस-रात्र या उड्डाणपुलावरून अवजड वाहनांची वाहतूक सुरु असल्याचे दिनांक २५ जुलै, २०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे तसेच छत्रपती शिवाजी महाराज स्थानकावरील पादचारी उड्डाणपुलावर घडलेल्या दुर्दैवी घटनेची पुनरावृत्ती या उड्डाणपुलावर होवू नये, यासाठी अवजड वाहनांच्या वाहतुकीस प्रतिबंध घालण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१३-१०-२०२२) : (१) व (२) रेल्वे हा केंद्र शासनाचा विषय आहे. सदर प्रश्नाबाबत रेल्वेकडून माहिती मागविण्यात आली होती. सदर माहितीनुसार आयआयटी मुंबईच्या सेफ्टी ऑडिटप्रमाणे चिंचपोकळी रेल्वे स्थानकावरील उड्डाणपूलावरून १६ टनापेक्षा जास्त वजनाच्या अवजड वाहनांची वाहतूक बंद करणे आवश्यक असल्याचे दिसून आले. त्यानुसार या उड्डाणपुलावरील ट्रेलर व अवजड वाहनांची वाहतूक थांबविण्याचा सल्ला मुंबई महानगरपालिकेला रेल्वेकडून देण्यात आला आहे. आयआयटीच्या शिफारशींनुसार उड्डाणपुलाच्या संरचनात्मक दुरुस्तीचे काम प्रगतीपथावर आहे. तथापि, सदर उड्डाणपूल वाहतुकीसाठी सुरक्षित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाअंतर्गत झालेल्या गैरव्यवहाराबाबत

(५) ३२४२६ (१८-०१-२०२२). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाअंतर्गत सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षात २ डी ॲनीमेशन अभ्यासक्रमाच्या अनुषंगाने देय असलेल्या शिष्यवृत्तीमध्ये गैरव्यवहार झाल्याचे व याबाबत जबाबदार असलेल्या डॉ. राजेंद्र वडणेरे यांच्यावर कारवाई करण्याबाबत संस्थेने केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने उचित कार्यवाही करण्यात यावी अशी विनंती श्री. किशोर अजाबराव देशमुख, शिव सहकार सेना, मुंबई यांनी दिनांक २३ ऑगस्ट,२०२१ रोजी वा त्यासुमारास पत्राद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (२३-०९-२०२२) :(१) हे खरे नाही.
यासंदर्भात विद्यापीठाने माजी न्यायमूर्ती श्री.पी.के. गायकवाड यांचे अध्यक्षतेखाली सत्य शोधन समितीची स्थापना केली होती. शिष्यवृत्ती गैरव्यवहार प्रकरणात डॉ. राजेंद्र वडनेरे यांचा आर्थिक बाबींशी संबंध नसल्यामुळे त्यांचेवर कार्यवाही करण्यात आलेली नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील वातावरणीय बदलाच्या परिणामांचा अभ्यास करण्यासाठी

(६) ३२७३७ (१२-०१-२०२२). श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर), श्री.सुनिल भुसारा (विक्रमगड), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.राजेश

नरसिंगराव पाटील (चंदगड), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.शिरीष चौधरी (रावेर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इंटरगर्व्हमेन्टल पॅनल ऑन क्लायमेंट चेंज (आयपीसीसी) या संयुक्त राष्ट्राच्या संस्थेने वातावरणीय बदलाच्या अनुषंगाने सादर केलेल्या अहवालानुसार पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाने दिनांक १ सप्टेंबर, २०२१ रोजीच्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत त्याबाबत सादरीकरण करुन माहिती देण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाने सादरीकरण करण्यांत आलेल्या अहवालात देशातील १२ शहरातील सागरी किनारपट्टी पाण्याखाली जाण्याचा धोका असल्याचे नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर अहवालात नमूद केलेल्या बाबीं लक्षांत घेऊन राज्यातील लहरी हवामान अतिवृष्टी, महापूर, भूस्खलन, उष्णतेच्या लाटा, जंगलातील वणवे अशा नैसर्गिक आपत्तींचा भविष्यात प्रभाव कमी करण्याच्या उपाययोजनांचा आराखडा आणि वातावरणीय बदलाच्या परिणामांवर करण्यांत येणाऱ्या कृतीचा अभ्यास करण्यासाठी राज्य वातावरणीय बदल परिषद स्थापन करण्यातचा निर्णय दिनांक १ सप्टेंबर, २०२१ रोजीच्या मा.मंत्रीमंडळाच्या बैठकीत घेण्यांत आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर राज्य वातावरणीय बदल परिषदेचे साधारणपणे स्वरुप व कार्यकक्षा काय आहे,

श्री. एकनाथ शिंदे (०७-१०-२०२२) : (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) होय , हे खरे आहे.
(४) मा. मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयानुसार मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली राज्य वातावरणीय बदल परिषद गठीत करण्याबाबत दिनांक २६/११/२०२१ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. त्यामध्ये नमूद केल्यानुसार नैसर्गिक आपत्तीचा भविष्यात प्रभाव कमी करण्याच्या उपाययोजनांचा आराखडा अंतिम करणे व त्याच्या प्रभावी अंमलबजावणीचे संनियंत्रण व मुल्यमापन करणे. राज्यातील वातावरणीय बदल परिणांमावर अनुकूलन (adaptation) उपशकमन (mitigation) यासाठीचा कालबध्द कृती आराखडा अंतिम करून त्याच्या प्रभावी अंमलबजावणीचे सनियंत्रण व मुल्यमापन करण्याची जबाबदारी राज्य वातावरणीय बदल परिषदेची आहे.

विभागीय कार्यालय व महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ (MSBTE) अंतर्गत असणाऱ्या सर्व पदांची भरती महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (MPSC) करणेबाबत

(७) ३३२२३ (१२-०१-२०२२). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत येणाऱ्या सर्व विभागीय कार्यालय व महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ (MSBTE) अंतर्गत असणाऱ्या सर्व सहसंचालक व Pre TAS Training Center मधील सर्व संचालक पदांची भरती महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (MPSC) करणेबाबत लोकप्रतिनिधींनी मा.उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांचेकडे दिनांक ०५ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, सदर पदावर शासनाच्या महाविद्यालयामधून प्राचार्य/प्राध्यापक दर्जाच्या कर्मचाऱ्यांस संचालक पदाचा कार्यभार देण्यात येतो,हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अध्यापनाचे काम करणाऱ्या प्राचार्य/प्राध्यापक यांना कोणत्याही प्रशासकीय कामकाजाचा अनुभव नसल्याने विभागीय सह संचालक कार्यालयातील प्रमुख कामकाज करणारे वेतन निश्चिती, अनुकंपातत्वावरील प्रकरणे, वैद्यकीय देयके, निवृत्ती वेतन ग्रॅज्युटी यासह अन्य प्रकरणे वर्षानुवर्षे प्रलंबित राहतात, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (१२-०९-२०२२) : (१) मा. लोकप्रतिनिधी यांचे दि. ०५.०१.२०२० रोजीचे अशा आशयाचे निवेदन प्राप्त झाले आहे.

(२) विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण या पदाचा अतिरिक्त कार्यभार प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक यांना व संचालक, भारतीय सेवापूर्व प्रशिक्षण केंद्राचा अतिरिक्त कार्यभार सहाय्यक प्राध्यापक यांना देण्यात येतो, हे खरे आहे.
(३) अंशत: खरे आहे.
(४) विभागीय सहसंचालक कार्यालयातील प्रलंबित प्रकरणासंदर्भात प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने "उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालय " या अभिनव उपक्रमांतर्गत विभागवार बैठका घेऊन प्रलंबित प्रकरणे मोठ्या प्रमाणात निकाली काढण्यात आली आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाने प्रदूषणकारी कारखान्यांना फ्युएल गॅस डिसल्फरासशन (FGD) कार्यपद्धती लावणे बंधनकारक केल्याबाबत

(८) ३३२९१ (१२-०१-२०२२). श्री.संजय सावकारे (भुसावळ) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाने काही वर्षांपूर्वी महाराष्ट्रातील प्रदूषणकारी ऊर्जा कारखान्यांना फ्युएल गॅस डिसल्फरासशन (FGD) कार्यपद्धती लावणे बंधनकारक केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, औष्णिक ऊर्जा प्रकल्पातून उत्सर्जित होणाऱ्या सल्फरडाय ऑक्साईडचे प्रदूषण कमी करण्यासाठी औष्णिक ऊर्जा प्रकल्पांना सन २०२१ पर्यन्त (FGD) तंत्रज्ञान लावणे बंधनकारक आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने अद्याप किती ऊर्जा प्रकल्पांमध्ये (FGD) सदर कार्यपद्धती कार्यान्वित केली आहे वा करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१३-०९-२०२२) : (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
केंद्रिय पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, भारत सरकार यांनी दि. ३१.०३.२०२१ रोजीच्या अधिसुचनेव्दारे औष्णिक विदयुत प्रकल्पांच्या स्थानानुसार A,B,C, अशी वर्गवारी करुन २०२२,२०२३ व २०२४ पर्यन्त फ्युएल गॅस डिसल्फरायझेशन (FGD) कार्यपध्दती लावणे बंधनकारक केले आहे.
(३) राज्यातील ३ औष्णिक विद्युत प्रकल्पांनी फ्युएल गॅस डिसल्फरायझेशन (FGD) कार्यपध्दती उभारली असुन उर्वरित औष्णिक विद्युत प्रकल्प सदर यंत्रणा उभारणार आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई-अहमदाबाद ,मुंबई-हैद्राबाद व मुंबई -नागपूर रेल्वे मार्गासाठी भूसंपादन करण्याबाबत

(९) ३३९७५ (१२-०१-२०२२). श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई-अहमदाबाद, मुंबई-हैद्राबाद व मुंबई-नागपूर या तीन रेल्वे मार्गासाठी राज्य शासनातर्फे भूसंपादन करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रत्येक प्रकल्पासाठी किती जमिनीच्या क्षेत्राची आवश्यकता आहे व त्यापैकी किती जमीन संपादित करण्यात आली आहे तसेच सदर तिन्ही रेल्वे मार्ग किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०३-१०-२०२२) : (१) व (२) रेल्वे हा केंद्र सरकारचा विषय आहे. अतिजलद रेल्वे मार्गांचे बांधकाम/अंमलबजावणी करण्यासाठी NHSRCL या उपयोजिता वाहनाची स्थापना करण्यात आलेली आहे. NHSRCL कडून प्राप्त माहितीनुसार मुंबई-हैद्राबाद व मुंबई-नागपुर या अति जलद गती रेल्वे मार्गांना अद्याप मंजूरी मिळालेली नाही. सद्यस्थितीत मुंबई-अहमदाबाद हा एकच मंजूरी मिळालेला अतिजलद गती रेल्वे मार्ग आहे. मुंबई-अहमदाबाद अतिजलद गती रेल्वे मार्गासाठी एकूण १३९६ हेक्टर जमिनीची आवश्यकता आहे. त्यापैकी १२५१.७८ हेक्टर जमीन संपादित करण्यात आली आहे. संयुक्त व्यवहार्यता अहवालानुसार हा रेल्वे मार्ग सन २०२३ पर्यंत पूर्ण करण्याचे लक्ष्य आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई- नागपूर हायस्पीड रेल्वेच्या बुलेट ट्रेन प्रकल्पाच्या सर्वेक्षणाच्या कामाबाबत

(१०) ३४५०३ (११-०१-२०२२). श्री.दौलत दरोडा (शहापूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई- नागपूर हायस्पीड रेल्वेच्या बुलेट ट्रेन प्रकल्पाच्या सर्वेक्षणाचे काम पूर्ण झाले आहे काय,
(२) असल्यास, या प्रकल्पाकरिता जमिन संपादन करण्याची प्रक्रियेला केव्हापासून सुरुवात होणार आहे,
(३) असल्यास, या प्रकल्पाकरिता किती जमिन संपादित करण्यात येणार आहे,
(४) असल्यास, याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

श्री. एकनाथ शिंदे (०३-१०-२०२२) : (१),(२),(३). रेल्वे हा केंद्र सरकारचा विषय आहे. अतिजलद रेल्वे मार्गांसाठी स्थापन करण्यात आलेले नॅशनल हायस्पीड रेल कॉर्पोरेशन लि. (NHSRCL) यांनी दिलेल्या माहितीनुसार मुंबई-नागपूर सविस्तर प्रकल्प अहवाल फेब्रुवारी २०२२ मध्ये रेल्वे मंत्रालयास सादर करण्यात आला आहे. मुंबई-नागपूर हायस्पीड रेल्वे प्रकल्पाला अद्याप मंजूरी मिळालेली नाही. त्यामुळे या टप्प्यावर भूसंपादनाचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे-मिरज लोहमार्गाच्या नुतनीकरणाच्या कामाबाबत

(११) ३५५५५ (११-०१-२०२२). श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे-मिरज लोहमार्गाच्या नुतनीकरणाचे काम दोन वर्षापासून सुरु आहे, हे खरे आहे,
(२) असल्यास, त्यामुळे वाल्हे (ता.पुरंदर, जि.पुणे) नजीक सुकलवाडी फाटयावरील भुयारी मार्गात पावसाचे पाणी साठत असल्याने अनेक अपघात झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यामुळे याठिकाणी दरडी कोसळू नयेत यासाठी संरक्षण भिंत, नागरीकांना जाण्यासाठी पर्यायी रस्ता, शेतक-यांना शेतामध्ये जाण्यासाठी पर्यायी रस्ता, भुयारी मार्गातील पाण्याचा निचरा होण्यासाठी पाईपलाईन इत्यादी कामे रेल्वेकडून व्हावीत, यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१२-०९-२०२२) : (१), (२), (३) व (४) रेल्वे हा केंद्र शासनाचा विषय आहे. सदर प्रश्नाबाबत मध्य रेल्वेकडून माहिती मागविण्यात आली होती. मध्य रेल्वेने दिलेली माहिती पुढीलप्रमाणे आहे :- पुणे-मिरज लोहमार्गाच्या दुहेरीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे. पुणे-मिरज लोहमार्गाच्या दुहेरीकरणाचे काम प्रगतीपथावर असले तरी या रेल्वे मार्गावर सुकलवाडीजवळ कोणताही भुयारी मार्ग तयार करण्यात येत नाही.

राज्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांना धानाचे चुकारे देण्याबाबत

(१२) ३७६८७ (०९-०४-२०२२). श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.रवि राणा (बडनेरा), श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धान उत्पादक शेतक-यांना बोनस न देता डीबीटीच्या माध्यमातून रक्कम जमा करण्यात येणार असल्याचा निर्णय शासनाने घेतला असून सदर रक्कम किती व कोणत्या निकषांवर देण्यात येणार आहे हे स्पष्ट नसल्याने धान उत्पादक शेतक-यांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, धानाला योग्य भाव मिळत नसल्याने व निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होऊन प्रत्यक्ष लागवडीचा खर्चही निघत नसल्याने हमीभावाव्यतिरिक्त प्रोत्साहन म्हणून राज्य शासनातर्फे दिला जाणारा बोनस हा शेतकऱ्यांसाठी महत्वाचा आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पणन हंगाम २०२०-२२ (खरीप) मध्ये राज्य शासनाच्यावतीने हमीभावाव्यवतिरिक्त धानाला प्रति क्विंटल रु.७००/- प्रति शेतकरी ५० क्विंटल मर्यादेत प्रोत्साहनपर राशी (बोनस) देण्यात आली असून सदर १८.६१ लाख मेट्रीक टन धानाची प्रोत्साहनपर राशीची रु.९४१ कोटी इतकी रक्कम थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पणन हंगाम २०२०-२२ (खरीप) मध्ये खरेदी करण्यात आलेल्या धानाचे दिनांक १७/०२/२०२२ रोजीपर्यंत ४,६५,९८८ शेतकऱ्यांकडून १३६८०७८४.१७ क्विंटल खरेदी करण्यात आलेल्या धानाचे अद्याप रु.११५७.५५ कोटीचे शेतकऱ्यांचे चुकारे देणे बाकी आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, प्रश्न भाग ४ मधील बाकी चुकारे कधीपर्यंत शेतकऱ्यांना देण्यात येणार आहेत, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रविंद्र चव्हाण (२८-०९-२०२२) :(१) व (२) हे अंशत: खरे आहे.

पणन हंगाम २०२१-२२ मध्ये केंद्र शासनाने धानासाठी निश्चित केलेल्या रु.१९४०/- प्रतिक्विंटल इतक्या हमीभावाने शेतकऱ्यांकडून धान खरेदी करण्यात येऊन शेतकऱ्यांना देय असलेले चुकारे अदा करण्यात आले आहेत.

पणन हंगाम २०२१-२२ मध्ये किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर राशी देण्याबाबत मा.लोकप्रनिधींकडून शासनास मागणी प्राप्त आहे. त्यानुषंगाने कार्यवाही प्रस्तावित आहे.

(३) हे खरे आहे.

पणन हंगाम २०२०-२१ मध्ये प्रोत्साहनपर राशीची रु.९४१ कोटी इतकी रक्कम थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात आलेली आहे.

(४) व (५) पणन हंगाम खरीप २०२१-२२ (खरीप) मध्ये किमान आधारभुत किंमत खरेदी योजनेंतर्गत राज्यात रु.२५९५.७० कोटी इतक्या रकमेच्या धानाची खरेदी करण्यात आली आहे. त्यापैकी रु.२५९२.१८ कोटी एवढया रकमेचे चुकारे शेतकऱ्यांना अदा करण्यात आले असून, रु.२९.०० लाख वितरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे. शेतकऱ्यांच्या बँक खाते क्रमांकात झालेला बदल, IFSC कोड, तसेच केंद्र शासनाच्या PFMS प्रणालीवरील शेतकरी आय.डी. जोडणी, इत्यादी तांत्रिक बाबींची पुर्तता करुन उर्वरित चुकारे तातडीने अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

मुंबई विद्यापीठांतर्गत असलेल्या महाविद्यालयांमध्ये प्राचार्य पद रिक्त असल्याबाबत

(१३) ३७६९३ (३१-०३-२०२२). श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.रवि राणा (बडनेरा), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड),

श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.योगेश सागर (चारकोप), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठांतर्गत येणाऱ्या १७८ महाविद्यालयांमध्ये प्राचार्य पद रिक्त असून प्रभारी पदावर महाविद्यालयांचा कारभार सुरू असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई विद्यापीठाच्या अंतर्गत येणाऱ्या महाविद्यालयांमध्ये प्राचार्य पदाऐवजी संचालक हे पद अस्तित्वात असल्याचे निदर्शनास आले आहे खरे आहे काय,

(३) असल्यास, नवीन अभ्यासक्रमास मंजुरी देताना महाविद्यालयांमध्ये प्राचार्य असणे अनिवार्य असूनही अनेक महाविद्यालयांना नवीन अभ्यासक्रमास मंजुरी देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (०१-०९-२०२२) :(१) हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतूदीनुसार तसेच शासनाच्या दिनांक १५.३.२०१२ च्या शासन निर्णयानुसार प्रभारी प्राचार्य नेमण्याची प्रक्रिया विहीत केली आहे. याबाबत कोविड-१९ च्या पार्श्वभुमीवर पदभरतीच्या निर्बंधामुळे नियमीत प्राचार्य नियुक्त करण्यास विलंब होत असल्याने. मुंबई -विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांमध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेता, सदर रिक्त पदावर प्रभारी प्राचार्यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

शासन निर्णय क्रमांक- एनजीसी २०१७/(२०८/१७)/मशि-४, दिनांक १३ सप्टेंबर, २०१७ अन्वये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेता, सन २०१८-१९ या शैखणिक वर्षापासून नवीन अभ्यासक्रमांस मंजूरी देऊन याबाबतची कार्यपध्दती व निकष ठरविण्यात आलेले आहेत. याअनुषंगाने विद्यापीठांनी शासनाकडे प्रस्ताव पाठविताना उक्त आदेशातील क्रमांक २.१ (ख) (अ) येथे नमूद केल्या नुसार महाविद्यालयांतील प्राचार्यासहित सर्व अध्यापकांची पदे अर्हताधारक व पात्र उमेदवारांमधून भरलेली आहेत याची खतरजमा करूनच प्रस्ताव शासनास सादर करावेत.अशी तरतूद आहे.

(४) अशासकीय अनुदानित महाविद्यालयांतील दैनंदिन प्रशासकीय व शैक्षणिक कामकाज व्यवस्थित पार पाडण्यासाठी तसेच राष्ट्रीय मुल्यांकन व अधिस्वीकृती प्रमाणिकरण (NAAC) मिळण्याकरीता वित्त विभागाचे पदभरतीचे निर्बंध शिथील करून उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दिनांक १२/११/२०२१ च्या आदेशान्वये अशासकीय अनुदानित महाविद्यालयांतील प्राचार्य संवर्गातील विविध कारणास्तव रिक्त असलेली पदे व प्राचार्य पदाचा पाच वर्षांचा कार्यकाल संपुष्टात आल्यानंतर रिक्त होणारी पदे भरण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

याअनुषंगाने मुबई विद्यापीठाच्या दिनांक ०५/०२/२०२२ च्या पत्रान्वये त्यांच्या अंतर्गत येणाऱ्या १२० महाविद्यालयांस प्राचार्य पद भरण्याबाबत विद्यापीठ स्तरावरून कळविण्यात आलेले असून, महाविद्यालयांकडून प्राप्त प्रस्तावांवर विद्यापीठामार्फत कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उदभवत नाही.

चिपळूण (जि.रत्नागिरी) मध्यवर्ती बसस्थानकाच्या हायटेक इमारतीचे काम प्रलंबित असल्याबाबत

(१४) ३७९८५ (०९-०४-२०२२).श्री.भास्कर जाधव (गुहागर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील चिपळूण मध्यवर्ती बसस्थानकाच्या हायटेक इमारतीचे काम ठेकेदार अपूर्णावस्थेत सोडून

गेल्यानंतर सदर ठेकेदारावर कारवाई करून कामाच्या नव्याने निविदा मागविण्यात आल्या असल्याचे मा. परिवहन मंत्री यांनी सांगितले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनेकदा पाठपुरावा करुन ठेकेदार काम सुरु करीत नसल्याने करार पत्रातील तरतूदीनुसार बांधकाम करार रद्द करुन ठेकेदाराची सुरक्षा अनामत रक्कम जप्त करुन त्यांचे नाव काळया यादीत टाकण्यात आले तसेच सदर कामाच्या नव्याने निविदा मागविण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर बसस्थानकाचे काम पुर्ण होण्याच्यादृष्टीने नव्याने मागविण्यात आलेल्या निविदा व ठेकेदार निश्चित होवून सदर कामाचा कार्यारंभ आदेश देणे तसेच सदर कामाची प्रक्रिया वेळेत पूर्ण न करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१३-१०-२०२२) :(१), (२),(३) व (४) रा.प.रत्नागिरी विभागातील चिपळुण बसस्थानकाची पुनर्बांधणी करणे (उर्वरीत काम) या कामाची ई-निविदा दि.०६.११.२०२० रोजी काढण्यात आलेली होती. त्यानंतर सदर कामाची निविदा दि.२४.१२.२०२० रोजी उघडण्यात आली. त्यानंतर निविदा स्विकृतीसाठी खाते निहाय समितीकडून दि.१०.०५.२०२२ रोजी मंजुरी प्राप्त झाल्यानंतर ठेकेदाराला दि.२५.०५.२०२२ रोजी करारपत्र करणेसाठी स्विकृतीपत्र देण्यात आले.

त्यानंतर दि.१९.०७.२०२२ रोजी ठेकेदारासोबत करारपत्र करुन कार्यादेश देण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.

माथेरान (जि.रायगड) पर्यटन क्षेत्राच्या परिसरातील निर्बंध हटविण्याबाबत

(१५) ३८०५५ (०९-०४-२०२२). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) : सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माथेरान (जि.रायगड) पर्यटन क्षेत्राच्या परिसरात पर्यटकांवर १०० टक्के रोजगार अवलंबून असलेल्या व्यावसायीकांनी माथेरान पर्यटन क्षेत्रावरील निर्बंध हटवण्याची मागणी मा.मुख्यमंत्री महोदयांना माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान पत्राव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२)असल्यास, माथेरान पर्यटन व थंड हवेच्या क्षेत्राला शासनाने विशेष प्रशासकीय दर्जा दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, माथेरानमधील पर्यटन क्षेत्रावरील निर्बंध हटविण्याबाबत माथेरानमधील व्यावसायीकांनी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने मा.मुख्यमंत्री महोदयांनी कोणता निर्णय घेतला आहे वा त्यानुषंगाने निर्णयात्मक कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. मंगलप्रभात लोढा (११-१०-२०२२) : (१) माथेरान येथे पर्यटन सुरु करण्याबाबत तत्कालीन मा. राज्यमंत्री (पर्यटन) यांनी तत्कालीन मा. मुख्यमंत्री यांना दि.१६.०६.२०२१ रोजी निवेदन दिले होते. तसेच माथेरान अश्वपाल संघटना आणि धनगर समाज यांनी माथेरान पर्यटन क्षेत्र अनलॉक करण्याबाबत दि.१०.०१.२०२२ रोजी प्रशासक तथा मुख्याधिकारी, माथेरान नगरपरिषद यांना निवेदन दिले होते.
(२) नाही. तथापि, जिल्हाधिकारी, रायगड यांनी दि.२५.०६.२०२१ च्या आदेशान्वये माथेरान या पर्यटन स्थळास कोरोनाबाबातचे निर्बंध शिथिल करण्याबाबत स्वतंत्र प्रशासकीय घटक घोषित केले होते
(३) जिल्हाधिकारी, रायगड यांच्या दि.०१.०२.२०२२ च्या आदेशानुसार रायगड जिल्हयातील सर्व पर्यटनस्थळे नियमित वेळेनुसार खुली करण्यात आली असून त्यानुसार माथेरान शहरातील सर्व स्थानिक प्रेक्षणीय स्थळे सुरु करण्यात आलेली आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील एम.टेक पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या जागा रिक्त असल्याबाबत

(१६) ३८३९६ (०४-०४-२०२२). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील एम टेक अभ्यासक्रमाच्या ६९ % जागा २०२१ या शैक्षणिक वर्षात रिक्त असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, २०२१-२०२२ या शैक्षणिक वर्षात बीई अभ्यासक्रमाच्या ५१००० जागा रिक्त राहिल्या असल्याचे निदर्शनास आले आहे , हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, आयआयटी सारख्या नामांकित संस्थांसोबत करार करून राज्यातील अभियांत्रिकी महाविद्यालयांची गुणवत्ता उंचविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (१९-०९-२०२२) : (१) व (२) अंशत: खरे आहे.

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये एम.ई./ एम.टेक.पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाची सर्वसाधारण प्रवेश क्षमता १२०६२ असून त्यापैकी ३८७९ इतक्या जागांवर प्रवेश झाले असून ८१८३ जागांवर (सुमारे ६७ टक्के) प्रवेश झालेले नाहीत.

तसेच बी.ई./बी.टेक. पदवी अभ्यासक्रमाची सर्वसाधारण प्रवेश क्षमता १२९४४३ असून त्यापैकी ८२९५५ जागांवर प्रवेश झालेले असून ४६४८८ जागांवर (सुमारे ३५ टक्के) प्रवेश झालेले नाहीत.

(३) राज्यातील अभियांत्रिकी महाविद्यालयांची गुणवत्ता उंचावण्यासाठी शासनाने खालीलप्रमाणे कार्यवाही केलेली आहे.:-

१.औद्योगिक क्षेत्रामधील आवश्यक गरजा आणि भविष्यातील संधींचा वेध घेऊन कौशल्य विकास वृद्धीसाठी संस्थेमध्ये न्यू इमर्जिंग टेक्नॉलॉजी संबंधित नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यात आले आहेत.

२. शैक्षणिक गुणवत्ता वृध्दींगत करण्यासाठी अभ्यासक्रमात सुधारणा व संस्थांची स्वायत्तता यावर भर देण्यात येत आहे.

३. प्रादेशिक भाषेत पदवी अभ्यासक्रम सुरू करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

४. तंत्र शिक्षणाचा दर्जा सुधार कार्यक्रम TEOIP- ३ चा तिसरा टप्पा राबविण्यात आलेला आहे.

५. इन्फोसिस कंपनीचा उच्च व तंत्र शिक्षण विभागासोबत अभ्यासक्रम आणि प्रशिक्षण यासाठी करार करण्यात येऊन त्या अंतर्गत विविध विषयांवरील आणि विविध कालावधीचे ३९०० पेक्षा जास्त ऑनलाईन कोर्सेस तयार केले असून हे सर्व कोर्सेस कंपनीच्या SpringBoard या ऑनलाईन मंचावर उपलब्ध करुन दिले आहेत.

६. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधील अध्यापक प्रशिक्षण विषयक तरतूदीचे पार्श्वभूमीवर उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत येणाऱ्या अध्यापकांना तसेच उच्च शिक्षणाशी संबंधित सर्व घटकांना उच्च दर्जाचे व्यावसायिक शिक्षण देण्याच्या हेतूने “महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था” स्थापन करण्यात आली आहे.

७. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने Internship Portal सुरू केले असून त्यामार्फत विद्यार्थ्यांना internship मिळण्याचा मार्ग सुलभ झाला आहे.

८.Board of Apprenticeship Training Mumbai (BOAT) यांचेकडून पदवी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना Apprenticeship देण्याची योजना कार्यान्वीत झाली असून त्यामार्फत विद्यार्थ्यांना उदयोगक्षेत्रात प्रशिक्षणाची संधी उपलब्ध झाली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

गंगाखेड (जि.परभणी) तालुक्यातील संत जनाबाई जन्मस्थळ तीर्थक्षेत्रास पर्यटन क्षेत्र घोषित करण्याबाबत

(१७) ३९४६० (०९-०४-२०२२). श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड) : सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोदावरी नदीच्या काठावर वसलेले गंगाखेड (जि.परभणी) हे शहर श्री संत जनाबाई यांच्या जन्माने पावन झालेले शहर असून यास प्रती दक्षिण काशी नावाने ओळखले जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ५० वर्षांपासून हे तीर्थक्षेत्र अजूनही पर्यटन क्षेत्र म्हणून घोषित झाले नसल्यामुळे विविध विकास कामे करण्यास अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या ठिकाणी शेकडो भाविक रोज येत असून त्यांची राहण्याची व अन्य सुखसुविधांची गैरसोय होत असल्याने स्थानिक लोकप्रतिनिधींनी (गंगाखेड) दिनांक ६ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास मा.उपमुख्यमंत्री यांना निवेदनाद्वारे पर्यटन क्षेत्र घोषित करण्याची मागणी करून निधी उपलब्ध करण्याची विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. मंगलप्रभात लोढा (११-१०-२०२२) : (१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय, दि.१६.०१.२०२१२ नुसार जिल्हयातील ठिकाणांची "क" वर्ग पर्यटनस्थळ म्हणून अंतिम निवड करण्यासाठी जिल्हा नियोजन समितीला शिफारस करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील पर्यटनस्थळे निवड समितीस देण्यात आले आहेत. यानुसार प्राप्त झालेले निवेदन जिल्हाधिकारी, परभणी यांना उचित कार्यवाहीसाठी पाठविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

खामगाव-जालना रेल्वे मार्गाबाबत

(१८) ४०२४८ (०९-०४-२०२२). श्रीमती श्वेता महाले (चिखली) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ब्रिटिश काळापासून मंजूर असलेल्या खामगाव-जालना हा रेल्वे मागाचे काम प्रलंबित असून या रेल्वे मार्गासाठी राज्य शासनाच्या हिश्श्याचा निधी देण्यास सकारात्मक असल्याचे आश्वासन मा.परिवहन मंत्री यांनी सभागृहाला दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाने या रेल्वे मार्गाच्या अंतिम भूखंड सर्वेक्षणाला मान्यता दिलेली असून त्यासाठी ३८७ कोटी रुपयांच्या निधीच्या खर्चास ही मान्यता दिली असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने राज्य शासनाच्या हिश्श्याचा निधी देऊन सदर कामास कधी सुरुवात करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२३-०९-२०२२) :(१) विधानमंडळाच्या सन २०२० च्या पहिल्या अधिवेशनामध्ये विधानसभा तारांकित प्रश्न क्रमांक १७०९ यावरील चर्चेदरम्यान मा. मंत्री (परिवहन) यांनी पुरक प्रश्नावर पुढीलप्रमाणे उत्तर दिलेले आहे, " अध्यक्ष महोदय, यासंदर्भात अधिवेशन संपल्यानंतर एक महिन्याच्या आत बैठक लावण्यात येईल. राज्य

शासनाच्या निधीचा प्रश्न नाही. केंद्र शासनाच्या रेल्वेने सर्व्हे केला पाहिजे, त्यानंतर त्यावर एस्टिमेट देऊ. केंद्र शासनाचा हिस्सा केंद्राने द्यायचा असतो व राज्याचा हिस्सा राज्याने द्यायचा असतो. राज्याचा हिस्सा देण्याची आपली तयारी आहे."
(२), (३) व (४) हा केंद्र शासनाशी संबंधित विषय असल्याने याबाबत दिनांक २१.०२.२०२२ च्या शासन पत्राव्दारे महाव्यवस्थापक, मध्य रेल्वे यांच्याकडून माहिती मागविण्यात आली. त्यानुषंगाने मुख्य प्रशासकीय अधिकारी (बांधकाम), मध्य रेल्वे यांनी दिनांक ०३.०३.२०२२ च्या पत्राव्दारे कळविल्यानुसार वस्तुस्थिती पुढीलप्रमाणे :- जालना-खामगाव या १५५ किमी लांबीच्या नवीन रेल्वे मार्गाच्या अंतिम स्थान सर्वेक्षणासाठी ३८७.५० लाख रूपये इतक्या खर्चास रेल्वे मंत्रालयाने मान्यता दिल्याचे रेल्वे बोर्डाने दिनांक ३०.१२.२०२१ च्या पत्रान्वये मध्य रेल्वेला कळविले आहे. त्यानुसार अंतिम स्थान सर्वेक्षण हाती घेण्यात येणार आहे. याबाबत निविदा मागविण्याची प्रक्रिया सुरू केली जाणार आहे. तथापि, या प्रकल्पास रेल्वे बोर्डाने अद्याप मान्यता दिलेली नसून केवळ सर्वेक्षणासाठी मान्यता दिलेली आहे

चंद्रपूर जिल्ह्यातील प्राचिन अंचलेश्वर मंदिराला पर्यटन वास्तूचा दर्जा मिळण्याबाबत

(१९) ४०३५७ (०९-०४-२०२२). श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) : सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्ह्यातील प्राचिन अंचलेश्वर मंदिराला पर्यटन वास्तूचा म्हणून दर्जा मिळावा तसेच मंदिर परिसराचे सुशोभिकरण व प्रकाश व्यवस्था करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जून, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान मा.पर्यटन मंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी मा.पर्यटन मंत्र्यांनी प्रधान सचिव, पर्यटन विभाग यांना तपासणी करुन अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यानुषंगाने अहवाल तयार करण्यात आला आहे काय, असल्यास सुरु असलेल्या कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. मंगलप्रभात लोढा (११-१०-२०२२) : (१) याबाबत मा. लोकप्रतिनिधींचे दि.०३.०३.२०२१ चे निवेदन प्राप्त झाले आहे.
(२) व (३) चंद्रपूर जिल्हयातील प्राचीन अंचलेश्वर मंदिर व परिसर विकासाचा प्रस्ताव केंद्रीय पर्यटन मंत्रालयाच्या "प्रसाद" योजनेंतर्गत केंद्र शासनास पाठविण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

बासलापूर (ता.चांदुर रेल्वे, जि.अमरावती) येथील ग्रामपंचायच्या शौचालय अनुदानात झालेला गैरव्यवहार

(२०) ४०९९७ (०७-०४-२०२२). श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बासलापूर (ता.चांदुर रेल्वे, जि.अमरावती) येथील सन २०१५ ते सन २०२० या वर्षामध्ये शौचालयाचा लाभ देतांना ग्रामपंचायत पदाधिकारी व कर्मचारी यांनी पदाचा दुरुपयोग करुन गरजू लाभार्थ्यांना डावलून इतरांना लाभ दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येथील यादीतील ४४ क्रमांकावर असलेल्या व्यक्तीला सुलभ शौचालय अनुदान देण्यात आले परंतु अद्यापपर्यंत शौचालय बांधली नाही तसेच आवास योजने मधून सुध्दा लाभ घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाची दिशाभूल करुन दोन वेळा शासनाच्या योजनांचा लाभ घेणाऱ्यांवर व त्यांना सहकार्य करणाऱ्या प्रशासनातील दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गुलाबराव पाटील (२९-०९-२०२२) : (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
स्वच्छ भारत मिशन (ग्रा) अंतर्गत सन २०१७ ते २०२० या कालावधीत ग्रामपंचायत बासलापूर, ता. चांदूर रेल्वे, जि. अमरावती येथील, एकूण ९२ लाभार्थ्यांनी वैयक्तिक शौचालयाचे बांधकाम केल्यानंतर, त्यांना प्रोत्साहन अनुदान प्रत्येकी रू. १२,०००/- अदा करण्यात आले आहे. या यादीतील अनुक्रमांक ४४ येथील लाभार्थी, श्री. विश्वनाथ रानुजी सोनोने, रा. बासलापूर यांनी, वैयक्तिक शौचालयाचे बांधकाम माहे फेब्रुवारी, २०१९ मध्ये केले आहे. तसेच बांधकाम करण्यात आलेल्या शौचालयाचे छायाचित्र, केंद्र शासनाच्या संकेतस्थळावर Geo Tagging द्वारा अपलोड केल्यानंतरच, प्रोत्साहन अनुदान रू. १२,०००/- दिनांक १८/०८/२०१९ रोजी लाभार्थ्यास अदा करण्यात आले आहे.
(३) पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत, PWL (permanent waiting list) प्रमाणे, लाभार्थ्यास आवास योजनेतंर्गत, घरकुलाकरिता रू. १.२० लक्ष चे अनुदान देण्यात येते. संबधित लाभार्थ्यांने, स्वच्छ भारत मिशन (ग्रा) अंतर्गत पूर्वी, वैयक्तिक शौचालय अनुदानाचा लाभ घेतला नसल्यास, शौचालयाचे बांधकाम केल्यानंतर, पात्र लाभार्थ्यांस प्रोत्साहन अनुदान रू. १२,०००/- अदा करण्यात येते. श्री. विश्वनाथ रानुजी सोनोने, रा. बासलापूर यांनी पूर्वी वैयक्तिक शौचालय अनुदानाचा लाभ घेतला नसल्याने, घरकुलाचे बांधकाम केल्यानंतर, त्यांना वैयक्तिक शौचालय अनुदानाचा लाभ देण्यात आला आहे. (४) प्रश्न उद्भवत नाही.

मुबंई विद्यापीठाच्या आरोग्य केंद्रातील समस्यांकडे होत असलेले दुर्लक्ष

(२१) ४१२८० (०९-०४-२०२२). श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई विद्यापीठाच्या कालिना संकुलात सन २००८ मध्ये विद्यापीठाने आरोग्य केंद्र सुरू केले असून सदर केंद्रात पूर्णवेळ वैद्यकीय अधिकारी, सहकारी कर्मचारी, उपकरणे व आवश्यक सुविधांचा अभाव दिसून येत आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात विशेषत: कोल्हापूर आणि पुणे विद्यापीठात आरोग्य केंद्र असून या केंद्रांमध्ये विद्यार्थी व कर्मचाऱ्यांना अल्प दरात सेवा दिली जाते, तसेच बाहेरून येणाऱ्या रुग्णांवर ही उपचार केले जातात पण मुंबई विद्यापीठाच्या आरोग्य केंद्राबाबत उदासीनता दिसून येत असून शासनाकडून काय उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहेत,
(३) असल्यास, या केंद्रासाठी घेण्यात आलेली लाखो रुपयांची वैद्यकीय उपकरणे, प्रयोग शाळेतील यंत्रणा वापराविना धूळ खात पडली आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, विद्यापीठात शेकडो विद्यार्थी आणि कर्मचारी राहत असल्याने त्यांना वैद्यकीय सेवेची गरज भासल्यास पालिका रुग्णालयात जाण्याचा सल्ला दिला जातो. हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (०७-०९-२०२२) :(१)अंशत: खरे आहे.
(२), (३) व (४) मुंबई विद्यापीठामध्ये असलेले आरोग्य केन्द्र हे प्राथमिक आरोग्य तपासणी केन्द्र आहे. याठिकाणी दोन MBBS (Allopathy) डॉक्टर रविवार वगळता इतर दिवशी २ तास उपलब्ध असतात. एक आयुर्वेदिक डॉक्टर मंगळवारी, गुरुवारी २ तास असतात तसेच एक परिचारिका व एक प्रयोगशाळा परिचर कार्यालयीन वेळेत पूर्णवेळ उपलब्ध असतात. मुंबई विद्यापीठातील आरोग्य केन्द्रात १ ऑक्सीजन सिलेंडर, ऑक्सीजन कॉन्सन्ट्रेटर मशिन, सक्शन मशीन, दोन बेड, डीफिब्रिलेटर मशिन, नेब्यूलायजर, ग्लुकोमिटर व IV Sets ही उपकरणे आहेत. आत्पत्कालीन औषधांमध्ये Snake Bite Injection , Dog Bite Injection व इतर आहेत. मुंबई विद्यापीठ आरोग्य केन्द्रात

प्राथमिक उपचार पूर्णपणे मोफत केले जातात. वर्ष २००८ मध्ये मुंबई विद्यापीठ व महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ , नाशिक (MUHS) नाशिक यांचेमध्ये झालेल्या करारानुसार अत्याधुनिक उपकरणे, ब्लड सेल कांऊटर, एलिसा रिडर विथ ऑटो ॲनालायझर, मायक्रोस्कोप, डिप फ्रीझर इत्यादी प्रयोगशाळा उपकरणे यंत्रणा मुंबई विद्यापीठाने खरेदी केली आहेत. परंतू त्याकरिता मनुष्यबळ (MUHS) नाशिक अद्याप उपलब्ध झालेले नाही. मुंबई विद्यापीठातील आरोग्य केन्द्र हे प्राथमिक आरोग्य केन्द्र असून प्राथमिक आरोग्य तपासणी केली जाते, गंभीर स्वरुपाची लक्षणे असल्यास तात्काळ पालिका रुग्णालयात जाण्याचा सल्ला दिला जातो.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

बांबवडे येथील अथणी (जि.कोल्हापूर) साखर कारखान्यात वजन मापात होत असलेला गैरप्रकार

(२२) ४१७०१ (०९-०४-२०२२). श्री.राजु (बाबा) जयवंतराव आवळे (हातकणंगले) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बांबवडे, जि.कोल्हापूर येथील अथणीसाखर कारखान्यात वजन करताना गैरप्रकार होत असल्याने त्याबाबत व्यवस्थापनावर गुन्हा नोंदविण्याची मागणी तक्रारदार श्री. वसंत कांदेकर (कुंभोज, ता.हातकणंगले) यांच्यासह किसान संघटनेने माहे जानेवारी, २०२२ रोजीच्या सुमारास वजन मापक विभाग, कोल्हापूर यांच्याकडे केली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,त्यानुसार संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. रविंद्र चव्हाण (१३-०९-२०२२) :(१) होय, निरीक्षक, वैध मापन शास्त्र, कोडोली विभाग, जि. कोल्हापूर यांचे कार्यालयाकडे दि. १४/१/२०२२, रोजी तक्रार करण्यात आली होती
(२) नियंत्रक, वैध मापन शास्त्र, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे दिनांक २०/१२/२०२१ च्या पत्रान्वये साखर कारखान्यामध्ये ऊस स्वीकारतांना व ग्राहकांच्या होत असलेल्या फसवणुकीबाबत कार्यपध्दतीचा अभ्यास करण्याकरीता एक पथक गठीत करण्यात आले होते. सदर पथकाकडून दि. १४/१/२०२२ रोजी अथणी शुगर कारखान्याच्या वजन काट्याची तपासणी केली असता उत्पादकाच्या ऊस वाहन ट्रकचे वजन २४४५० किलोग्रॅम असतांना त्यांना २३४२० किलोग्रॅम वजनाची पावती दिल्याचे आढळून आले. त्यामुळे सदर कारखाना व संचालकांवर वैध मापन शास्त्र अधिनियम, २००९ च्या कलम ३० (सी) अन्वये खटला नोंदविण्यात आला होता.
सदर खटला सह नियंत्रक, वैध मापन शास्त्र, पुणे विभाग यांचेस्तरावर तडजोडीन प्रशमीत करुन निकाली काढण्यात आला असून, कारखाना व त्यांचे १५ संचालक यांचेकडून रुपये ८०,०००/- एवढा दंड (प्रशमन शुल्क) वसूल करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही

राज्यात अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियमांतर्गत सुटका करण्यात आलेल्या पिडीत महिलांना तसेच देहविक्री व्यवसायातील महिलांना शिधापत्रिका देण्याबाबत

(२३) ४२२२५ (१२-०४-२०२२). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियमांतर्गत सुटका करण्यात आलेल्या पिडीत महिलांना तसेच देहविक्री व्यवसायातील महिलांना शिधापत्रिका देण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वेश्याव्यवसाय करण्या-या बालवेश्या व वेश्यांच्या मुलांच्या पुनर्वसनासाठी स्थापन केलेल्या सल्लागार समितीच्या सुचनेनुसार त्यांना शिधापत्रिका देण्याचे शासनाच्या विचाराधीन होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राष्ट्रीय एडस नियंत्रण संस्था व राज्य एड्स नियंत्रण संस्था यांच्याकडे असणाऱ्या यादीतील स्वयंसेवी संस्थांकडून अनैतिक व्यपार व प्रतिबंध अधिनयिमांतर्गत सुटका करण्यात आलेल्या महिलांना नवीन शिधापत्रिका वितरण करण्याची कार्यवाही संबंधित संस्था व महिला बालविकास विभागाकडून करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर शासन निर्णयांतर्गत यादीतील किती महिलांना शिधापत्रिका वाटप करण्यात आल्या आहेत वा करण्यात येणार आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. रविंद्र चव्हाण (१४-१०-२०२२) :(१) व (२) होय. देहविक्री व्यवसाय करणाऱ्या महिलांना नविन शिधापत्रिका देण्यासाठी ओळखीचा पुरावा (Identification Proof) व वास्तव्याचा पुरावा (Residential Proof) सादर करण्यापासून सूट देण्यात येऊन अनुज्ञेय शिधापत्रिका वितरीत करण्याबाबतचा निर्णय दि.१३.०१.२०२२ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.
(३) महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रक संस्था, मुंबई यांनी दिनांक २५.०४.२०२२ च्या पत्रान्वये कळविल्यानुसार मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या न्यायनिर्णयानुसार महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, मुंबई यांनी तयार केलेत्या SOP नुसार जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हा कार्यक्रम अधिकारी, सामान्य रुग्णालय व NGO यांच्या संयुक्त प्रयत्नाने शिबीरांच्या माध्यमातून सद्य:स्थितीत वंचित असलेल्या देहविक्री व्यवसाय करणाऱ्या महिलांना गोपनियतेचा भंग न करता शिधापत्रिका व त्यावर कोरडे अन्नधान्य वितरीत करण्याबाबत दिनांक १४.०५.२०२२ च्या पत्रान्वये सूचना देण्यात आल्या आहेत.
(४) उपनियंत्रक शिधावाटप (आस्थापना) प्रधान कार्यालय, मुंबई यांचे दिनांक १०.०६.२०२२ च्या पत्रानुसार सह संचालक, महाराष्ट्र राज्य एडस नियंत्रण सोसायटी, वडाळा, मुंबई यांचेकडील माहितीनुसार राज्यातील एकूण ७४८११ देहविक्री करणाऱ्या महिलांपैकी ६०६९७ महिलांना शिधापत्रिका वितरित करण्यात आल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर शहरात वायू निरीक्षण केंद्रांची संख्या वाढविण्याबाबत

(२४) ४२२७६ (०९-०४-२०२२). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर शहरात वायू प्रदूषण मोजण्यासाठी प्रभावी यंत्रणा उपलब्ध नसल्याची तसेच शहराला २२ वायू निरीक्षण केंद्रांची आवश्यकता असताना केवळ ६ केंद्रे कार्यरत असल्याची बाब दिनांक १३ जानेवारी, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागपूर शहरात वायू निरीक्षण केंद्रांची संख्या वाढविण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती ठोस कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. एकनाथ शिंदे (१३-०९-२०२२) : (१) व (२) हे खरे नाही.
केंद्रिय प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शक तत्वानुसार नागपुर शहरात ६ ठिकाणी सतत वातावरणीय हवा गुणवत्ता मापक संयंत्र (CAAQMS) लावण्याबाबत प्रस्तावित होते. त्यापैकी नागपुर शहरात हवेची गुणवत्ता मोजमाप करण्याकरिता सतत वातावरणीय हवा गुणवत्ता मापक संयंत्र (CAAQMS) ४ ठिकाणी बसवण्यात आले असुन ते कार्यरत आहेत. त्याच बरोबर याव्यतिरिक्त राष्ट्रीय हवा गुणवत्ता यांजने अंर्तगत (NAMP/SAMP) नागपुर शहरातील ३ स्थळावर हवा गुणवत्ता तपासणी यंत्र (RDS) लावले असुन ते नागपुर शहरातील शैक्षणीक संस्था व्हि.एन.आय.टी मार्फत चालविण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

तुळजापूर मंदिर संस्थांच्या मालकीचे अभियांत्रिकी महाविद्यालय शासनाकडे हस्तांतरित करण्याबाबत

(२५) ४२४५७ (०९-०४-२०२२). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तुळजापुर मंदिर संस्थानच्या मालकीचे असलेले अभियांत्रिकी कॉलेज शासनाकडे वर्ग करण्याचा ठराव दिनांक २६ जानेवारी, २०२२ रोजी व याआधी दिनांक २३ जानेवारी, २०२१ रोजी शालेय मंदिर संस्थांच्या बैठकीमध्ये घेण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इंजिनिअरींग कॉलेज मधील शैक्षणिक गुणवत्ता सुधारावी, येथील कर्मचाऱ्यांना वेळेत वेतन व मानधन मिळावे तसेच विद्यार्थ्यांना चांगल्या सुविधा मिळण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांच्याकडे वारंवार मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू अभियांत्रिकी महाविद्यालय शासनाकडे हस्तातंरण करण्याबाबत तसेच जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठी चांगली शैक्षणिक सुविधा उपलब्ध व्हावी यासाठी संस्थाकडील महाविद्यालय तंत्र शिक्षण विभागाकडे वर्ग करण्यासाठी शासनाने कोणती कार्यावही केली आहे वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (१९-०९-२०२२) : (१) अंशत: खरे आहे.

- अश्या स्वरुपाचा विश्वस्त मंडळाचा ठराव दि.२६.०५.२०१७ रोजी पारित झालेला आहे.

(२) अंशत: खरे आहे.

- अश्या स्वरुपाच्या मागण्या स्थानिक लोक प्रतिनिधींनी केलेल्या आहेत.

(३) श्री.तुळजाभवानी मंदिर संस्थान संचलित तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय, तुळजापूर हे महाविद्यालय १९८३ पासून कायम विनाअनुदानित तत्वावर कार्यरत आहे. शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे कायम विनाअनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालयांना शासन अनुदानित म्हणून दर्जा देण्याचे शासनाचे धोरण नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

केज (ता.अंबाजोगाई, जि.बीड) येथील तहसील कार्यालयात शिधापत्रिकाबाबतचे प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत

(२६) ४३१८१ (१६-०३-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केज (ता.अंबाजोगाई, जि.बीड) येथील तहसील कार्यालयात स्वस्त धान्य मिळण्यासाठी आवश्यक असलेल्या शिधापत्रिकासाठीचे हजारांहून अधिक प्रस्ताव मागील दोन वर्षापासून प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक कुटुंबाची शिधापत्रिका जीर्ण झाली असल्यामुळे त्यांनी त्याची दुय्यम प्रत मिळण्याबाबत अर्ज केला आहे परंतु त्यांनाही शिधापत्रिका उपलब्ध करून देण्यात आलेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लाभार्थ्यांची नावे ऑनलाईन सादर करुनही शिधापत्रिका उपलब्ध नसल्यामुळे माहे डिसेंबर, २०२२ पासून एकाही लाभार्थ्यास धान्य देण्यात आले नाही तसेच वैद्यकिय उपचार व इतर शासकीय कामांसाठी नागरीकांना अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी केज (ता.अंबाजोगाई, जि.बीड) येथील तहसील कार्यालयात नवीन रेशन कार्ड उपलब्ध करून देण्याची मागणी जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे दिनांक २७ जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. रविंद्र चव्हाण (१३-१०-२०२२) : (१) मागील २ वर्षांमध्ये अंबाजोगाई तहसिल कार्यालयामार्फत प्राप्त अर्जांनुसार ५३ शुभ्र, ११२ पिवळ्या व १२२६ केशरी शिधापत्रिका वितरीत केल्या आहेत. तसेच केज तहसिल कार्यालयामार्फत प्राप्त अर्जांनुसार १४८ शुभ्र, ४५८ पिवळ्या व ३८२ केशरी शिधापत्रिका वितरीत केल्या आहेत. सद्य:स्थितीत अंबाजोगाई व केज तहसिल कार्यालयांमध्ये अनुक्रमे २५९ व १३४ अर्ज त्रुटींच्या पुर्ततेअभावी प्रलंबित आहेत.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) होय, हे खरे आहे.
(५) शासकीय मुद्रणालय, औरंगाबाद येथून जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालयास एकुण १५५०० नवीन कोऱ्या केशरी शिधापत्रिका दि.१५.०३.२०२२ रोजी प्राप्त झालेल्या आहेत. तालुक्यांच्या मागणी व आवश्यकतेनुसार दि.१५.०३.२०२२ रोजी अंबाजोगाई-१५००, बीड-२००० व केज-२१९६, याप्रमाणे शिधापत्रिकांचे वाटप करण्यात आले आहे. जिर्ण, नवीन व दुय्यम शिधापत्रिकांसाठी प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करुन पात्र लाभार्थ्यांना शिधापत्रिका वितरित करावयाची कार्यवाही तहसिल स्तरावरुन करण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

कोकण एज्युकेशन ॲकॅडमीची निर्मिती होणेबाबत

(२७) ४३३७३ (०४-०४-२०२२). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोकणातील विद्यार्थ्यांना भविष्यात स्पर्धा परिक्षांमध्ये यशस्वी होण्याकरिता तसेच चांगल्या नोकऱ्या मिळण्यासाठी व्यवसायाभिमुख अभ्यासपध्दती उपलब्ध करुन देण्यासाकरिता सिंधुदुर्ग, रत्नागिरी तसेच रायगड मध्ये कोणतेही व्यवस्थापन नसल्याने त्यांना मुंबई किंवा पुणे शहरात जावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोकणामध्ये कोकण एज्युकेशन ॲकॅडमीची निर्मिती व्हावी ज्यामध्ये आयएएस, आयपीएस, एनडीए सारखी स्पर्धा परिक्षांची तयारी करुन घेतली जावी याकरीता सिंधुदुर्ग, रत्नागिरी आणि रायगड जिल्हयाचे सीमा भागात IIT, NIT सारख्या प्रगत केंद्र शासन अंकित शैक्षणिक संस्थांची निर्मिती व्हावी अशी मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (१६-०८-२०२२) :(१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

महाराष्ट्र जीवन प्राधिकारणातील रिक्त पदे भरण्याबाबत

(२८) ४३४८२ (०९-०४-२०२२). श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात नळपाणी पुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत राबविण्यात येते, परंतू अनेक जिल्हयात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणात अधिका-यांची व कर्मचा-यांची अनेक पदे रिक्त असल्याने नळपाणी पुरवठा योजनांच्या कामांना गती मिळत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील रिक्त पदे भरण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गुलाबराव पाटील (१७-०८-२०२२) : (१), २) व ३) प्राधिकरणातील एकूण ५०४८ मंजूर पदांपैकी ३०३२ पदे रिक्त आहेत. सन १९९२ मध्ये भारतीय राज्य घटनेत करण्यात आलेल्या ७३ व्या घटनादुरुस्तीनुसार पंचायत राज व्यवस्थेला घटनात्मक दर्जा दिला आहे. तसेच राज्यघटनेच्या ११ व्या अनुसूचीमध्ये पाणीपुरवठा हा विषय समाविष्ट करुन पंचायत राज संस्थांकडे सोपविला आहे. त्यामुळे राज्यामध्ये जिल्हा परिषदांतर्गत ग्रामीण पाणीपुरवठा विभाग हा स्वतंत्र घटक निर्माण होऊन पाणीपुरवठा योजना राबविण्याचे अधिकार या घटकाला दिले आहेत. साहजिकच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील कामाचा भार कमी होऊन प्राधिकरणाचे उत्पन्न देखील कमी झाले. परिणामी प्राधिकरणातील कर्मचाऱ्यांची संख्या आवश्यकतेपेक्षा अधिक झाली होती. त्यामुळे प्राधिकरणाने सन मार्च, २००० पासून नवीन भरती बंद केली होती. प्राधिकरणाचे उत्पन्न कमी झाल्यामुळे प्राधिकरणातील कर्मचाऱ्यांना वेतन/ सेवानिवृत्ती वेतन देण्यास प्राधिकरणाला अडचणी उद्भवू लागल्या. त्यामुळे प्राधिकरणाने काही अपवाद वगळता नवीन भरती केलेली नाही.

मार्च, २०१७ पासून प्राधिकरणातील अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या वेतनाचे व सेवानिवृत्ती वेतनाचे दायित्व शासनाने स्वीकारले आहे. सद्य:स्थितीत वित्त विभागाच्या दिनांक २.६.२०१५ च्या शासन निर्णयानुसार नवीन पदभरतीवर निर्बंध असल्यामुळे प्राधिकरणामध्ये नवीन पदभरती करण्यास मर्यादा आहेत. वित्त विभागाने दिनांक ३०.०७.२०२१ व दिनांक १२.०४.२०२२ च्या शासन निर्णयान्वये नवीन पदभरतीला सशर्त परवानगी दिली असून त्यानुषंगाने विभागाच्या स्तरावर स्वतंत्ररित्या कार्यवाही सुरु आहे.

मार्च, २०१७ पासून प्राधिकरणातील अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या वेतनाचे व सेवानिवृत्ती वेतनाचे दायित्व शासनाने स्वीकारले असल्यामुळे सन २०१९ पासून प्राधिकरणाने आवश्यकतेनुसार अनुकंपा भरतीद्वारे नवीन भरती केली आहे. तसेच बाह्ययंत्रणेद्वारे आवश्यक कर्मचारी वर्ग प्राधिकरणाने उपलब्ध करुन घेतला आहे.

गोंदिया जिल्ह्यात धान साठवणूक गोदाम नसलेल्या संस्थेला खरेदीची परवानगी दिल्याबाबत

(२९) ४३६८८ (०९-०४-२०२२). श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सहकारी संस्थेला धान खरेदीची परवानगी मिळण्याकरिता साठवण गोदाम आवश्यक असतांना गोंदिया जिल्ह्यात गोदामे नसलेल्या संस्थांना शासकीय आधारभूत धान खरेदी केंद्र मंजूर करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने गोदामे नसलेल्या संस्थांची मान्यता रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रविंद्र चव्हाण (१४-०९-२०२२) :(१) हे अंशत: खरे आहे.

पणन हंगाम २०२१-२२ मध्ये गोंदिया जिल्ह्यात बिगर आदिवासी क्षेत्रात मार्केटिंग फेडरेशनमार्फत धान खरेदी केंद्रावर संस्थेचे स्वत:चे अथवा भाडेतत्वावर घेतलेले खाजगी गोदाम असल्याची शहानिशा करुन १०७ खरेदी केंद्रांना मंजूरी दिलेली आहे.

तथापि, गोंदिया जिल्ह्यात आदिवासी बहुल भागात आदिवासी विविध कार्यकारी संस्थांमार्फत होणाऱ्या धान खरेदी केंद्रावर गोदाम व्यवस्था नसल्याने, शासन निर्णयातील तरतुदीनुसार खुल्या जागेत शास्त्रोक्त पध्दतीने अन्नधान्य साठवणूक करण्याबाबत दिलेल्या निर्देशानुसार महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्या., नाशिक या अभिकर्ता संस्थेमार्फत गोंदिया जिल्ह्यात ४४ धान खरेदी केंद्राना मंजुरी देण्यात आलेली आहे.

शासन निर्णयातील तरतुदीनुसार उक्त योजनेंतर्गत धान खरेदी केल्यावर भरडाईअंती प्राप्त होणारा कच्चा तांदूळ शासकीय गोदामात जमा होईपर्यंतची सर्व जबाबदारी संबंधित अभिकर्ता संस्थांची राहते.

(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

वालधूनी, उल्हास व पुंडलिका, भोगावती या नद्यांच्या शुध्दीकरणासाठी केंद्राने आर्थिक निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

(३०) ४४०९८ (०९-०४-२०२२). श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वालधूनी, उल्हास, पुंडलिका व भोगावती या नद्यांच्या शुध्दीकरणासाठी केंद्राने आर्थिक निधी उपलब्ध करुन द्यावा व निती आयोगाच्या योजनेत या नद्यांचा समावेश करण्यात यावा यासाठी राज्य शासनाने केंद्राकडे प्रस्ताव पाठवून त्यासाठी ३ हजार ८१० कोटी रुपयांची तरतूद करावी अशी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने केंद्र शासनाने कोणता निर्णय घेतला व घेतलेल्या निर्णयाबाबत राज्य शासनास कळविले आहे काय,
(३) नसल्यास, याबाबत राज्य शासनाकडून पाठपुरावा करण्यात आला आहे काय त्याची सद्यःस्थिती काय आहे ?

श्री. एकनाथ शिंदे (३०-०९-२०२२) : (१) होय. दि.२८ जून २०१९ रोजीच्या पत्रान्वये राज्यातील २१ नद्यांच्या संवर्धनासाठी रु.३८१०.६६ कोटींचा प्रस्ताव निती आयोगास सादर करण्य़ात आलेला होता.
(२) सदर बाब केंद्र शासनाकडे प्रलंबित आहे.
(३) दि.०६.११.२०२० च्या पत्रान्वये तसेच राज्य शासनाच्या विविध माध्यमांद्वारे निती आयोगाकडे पाठपूरावा करण्यात आलेला आहे.

राज्यातील शिधापत्रिका धारकांना दरमहा धन्य आल्याच्या एस.एम.एस.गेट वे यंत्रणा प्रणाली संदर्भात

(३१) ४४२०३ (०९-०४-२०२२). श्रीमती मुक्ता टिळक (कसबापेठ) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शिधापत्रक धारकांना दरमहा रेशनिंग दुकानातून धान्य आले असल्याबाबतचा मेसेज एस.एम.एस.गेटवे सुविधाद्वारे देण्यात येतो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेची अंमलबजावणी राज्यातील सर्व जिल्हयात करण्यात येते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, एस.एम.एस.सुविधा प्रणाली पुणे शहर व जिल्हा परिसरात सध्या कार्यान्वित नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर एस.एम.एस. यंत्रणा प्रणाली पुणे शहर व जिल्हा परिसरात पुन्हा कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) तसेच जे शिधापत्रक धारक धान्य घेऊन जाणे बाकी आहे त्यांना सदरचे एस.एम.एस.गेट प्रणालीवर धान्य घेऊन जाण्यासाठी अलार्म एस.एम.एस.महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात किंवा महिना संपण्यापूर्वी पाठवण्याकरीता शासन स्तरावर सर्व जिल्हा पुरवठा आधिकाऱ्यांना सुचना देण्यात आल्या आहेत काय,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रविंद्र चव्हाण (१८-१०-२०२२) : (१) अंशत: खरे आहे. अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाकरिता "ग्रुप एसएमएस" ही सुविधा दि.११.६.२०१२ रोजीच्या शासन निर्णयान्वये कार्यान्वित करण्यात आली आहे. त्याअंतर्गत क्षेत्रीय कार्यालयांना लॉगीन व एसएमएस उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. सदर एसएमएस सेवेद्वारे शासकीय गोदामातून रास्तभाव दुकानांकडे धान्य रवाना झाल्यानंतर लगेचच त्या दुकानांच्या परिसरातील लाभार्थ्यांच्या प्रतिनिधींना एसएमएस द्वारे माहिती पाठविली जाते. रास्तभाव दुकाननिहाय २५ लोकांचा समूह तयार करण्यात आला असून सदर माहिती SMS द्वारे त्यांना पाठविली जाते.

सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांना रास्तभाव दुकानातून अनुज्ञेय असलेल्या धान्याची माहिती SMS द्वारे कळविण्याबाबत क्षेत्रीय ई- परिमंडळ, मुंबई शिधावाटप कार्यालय येथे प्रायोगिक तत्वावर कार्यवाही करण्यात येत आहे.

(२) सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या संगणकीकरण प्रकल्पांतर्गत "Push SMS" या सेवेद्वारे सद्दस्थितीत लाभार्थ्यांच्या प्रतिनिधींना एसएमएस पाठविण्याच्या सुविधेची अंमलबजाणी राज्यात करण्यात येत आहे. सदर सुविधेमधून एसएमएस पाठवितांना काही तांत्रिक अडचणी येत होत्या. तथापि, सदर तांत्रिक अडचणीचे निराकरण करण्यात आले आहे.

(३) पुणे शहर व पुणे जिल्हयांमध्ये एस.एम.एस. प्रणाली उपलब्ध आहे, तथापि, सध्या कार्यान्वित नाही. तसेच रास्तभाव दुकानदार यांनी शिधापत्रिकाधारकांचा व्हॉट्सॲप ग्रुप तयार केला आहे. सदर ग्रुप मध्ये शिधापत्रिकाधारकांना धान्य नेण्याकरीता एसएमएस पाठविण्यात येतो.

(४) पूणे शहर व पूणे जिल्हयामधील तसेच इतर जिल्हयातील एसएमएस प्रणालीचे लॉगिन कार्यान्वित करण्याबाबत सर्व क्षेत्रीय कार्यालयांना दि.२०.०६.२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(५) या प्रणालीद्वारे लाभार्थ्यांच्या प्रतिनिधींना एसएमएस द्वारे माहिती पाठविली जाते. सद्यस्थितीत धान्य घेऊन जाणे बाकी आहे अशा लाभार्थ्यांना अलार्म एसएमएस सुविधा कार्यान्वित नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील महाविद्यालय व शैक्षणिक संस्थातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे नव्याने रोस्टर तयार करून रिक्त पदे भरण्याबाबत

(३२) ४४४९४ (०२-०५-२०२२). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १ हजार १७१ शासकीय महाविद्यालयांमध्ये विद्यार्थी संख्येनुसार तसेच सेवानिवृत्त झालेल्या प्राध्यापकांच्या १७ हजार च्या जागा रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या किमान १२ हजार जागा रिक्त असून महाविद्यालयांमधील प्राध्यापक व प्रशासकीय सेवकांची हजारो पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संवर्गनिहाय आरक्षण कायद्याची तत्काळ अंमलबजावणी करून राज्यातील महाविद्यालयांमध्ये प्राध्यापक पदभरतीची प्रक्रिया गतिमान करण्याबाबतची मागणी महाराष्ट्र नव प्राध्यापक संघटनेच्या वतीने शासनाकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महाविद्यालय आणि शैक्षणिक संस्थेमध्ये आरक्षणाची अंमलबजावणी संवर्गनिहाय पदभरती करण्याबाबत तसेच सर्व शिक्षण संस्थांना नव्याने रोस्टर तयार करून पदभरतीची प्रक्रिया सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (२१-०९-२०२२) : (१) हे अशंत: खरे आहे.

(२) शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या किमान १२ हजार जागा रिक्त आहेत हे खरे नाही.

तथापि प्राचार्य संवर्गातील १०० टक्के पदे आणि सहयोगी प्राध्यापक यांची २०८८ पदाच्यां पदभरतीस उच्च स्तरीय सचिव समितीने मंजुरी दिल्यामुळे शासनाने उपरोक्त पदभरतीस दि. १२.११.२०२१ च्या शासन निर्णयान्वये मान्यता दिली आहे.

(३) होय खरे आहे.

(४) राज्यातील अशासकीय अनुदानित महाविद्यालयांतील शिक्षकीय पदभरती करताना विषय निहाय आरक्षण धोरणाचा अवलंब करण्यात येत होता. मात्र केंद्राने संवर्गनिहाय आरक्षण अध्यापक संवर्गातील आरक्षण अधिनियम २०२१ नुसार राज्यातील अकृषि विद्यापिठे व संलग्नित महाविद्यालये/ संस्था मधील शिक्षकीय पदांचे संवर्गनिहाय आरक्षण धोरण

सामान्य प्रशासन दि. १.०४.२०२२ रोजीच्या अधिसुचनेन्वये लागू करण्यात आलेले आहे. त्यानुसार अंमलबजावणी करण्याबाबत विभागाने दि ८.०४.२०२२ रोजी आधिसुचना निर्गमित केली असून, सदर आरक्षण धोरणाची नेमकी कार्यपध्दती कशी असावी, या बाबतच्या मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

तसेच सर्व महाविदयालयांनी बिंदू नामावली निश्चित करुन घेऊन नवीन आरक्षण धोरणानुसार पदभरती ना हरकत प्रमाण पत्रासाठी प्रस्ताव सादर करण्याबाबत. दि ८.०५.२०२२ रोजीच्या पत्रान्वये निर्देश देण्यात आलेली आहेत. त्यानुसार परभरतीची कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उदभवत नाही.

मुंबई विद्यापीठाच्या कालिना कॅम्पसमची संरक्षक भिंतीबांधण्याबाबत

(३३) ४५०३६ (२५-०९-२०२२). श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.संजय केळकर (ठाणे), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापिठाच्या कालिना संकुलातील वांद्रे-कुर्ला संकुला लगतची विद्यापीठाची संरक्षक भिंत तुटून अनेक वर्षाचा कालावधी होऊनही अद्यापही भिंत न बांधल्यामुळे विद्यापिठाच्या सुरक्षेला धोका निर्माण झाल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संरक्षक भिंतीअभावी सदर जागेवर मोठया प्रमाणात घुसखोरी, गैरवापर तसेच समाज विघातक व्यक्तींचा वावर वाढलेला असून परिसरात घाणीचे साम्राज्य पसरल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (१४-१०-२०२२) : (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

मुंबई विद्यापीठाने बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण तसेच राज्य सरकारला विद्यापीठाकडील काही जमीन रस्ते, पुल, आदि बांधकामासाठी दिली आहे. या जमीनींपैकी मुंबई विद्यापीठाच्या परिसरातील जागा बांद्रे-कुर्ला कॉम्पलेक्स ते हंसभूर्गा मार्गास जोडणाऱ्या उन्नत मार्गासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास उपलब्ध करुन दिली आहे. सदर रस्त्याचे काम करताना मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी संरक्षण भिंत काढली होती. त्यामुळे सदर ठिकाणी काही प्रमाणात अनुचित घटना घडल्या आहेत. सदरच्या घटना टाळण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचेमार्फत सदर भागातील संरक्षक भिंत बांधण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील सर्व कला महाविद्यालये एका कला विद्यापीठाच्या कक्षेत आणण्याबाबत

(३४) ४५१३३ (१७-०९-२०२२). श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व कला महाविद्यालये एका कला विद्यापीठाच्या कक्षेत आणण्याबाबत शिफारशी करण्यासाठी शासनाने एक समिती नियुक्त केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समितीची कार्यकक्षा व स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, सदर समितीचा अहवाल केव्हापर्यंत अपेक्षित आहे,
(४) असल्यास, समितीकडून अंमलबजावणी होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (१३-१०-२०२२) : (१) हे खरे नाही
(२) (३) (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

म्हसणे-सुलतानपूर (ता.पारनेर,जि.अहमदनगर) येथे स्वस्त धान्याचा काळाबाजार होत असल्याबाबत

(३५) ४५२६४ (१६-०९-२०२२). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) म्हसणे-सुलतानपूर (ता.पारनेर,जि.अहमदनगर) येथे स्वस्त धान्य दुकानातील धान्याची काळ्या बाजारात विक्री होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच सदर स्वस्त धान्य दुकान जनसेवा महिला स्वयंसहाय्यता बचत गटाच्या माध्यमातून चालविण्यात येत असून या दुकानातून अंदाजे २४ मयतांच्या नावाने धान्य वाटप करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर गैरव्यवहाराची तक्रार स्थानिकांनी करुन देखील प्रशासनाने संबंधित दुकानावर कोणतीच कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रविंद्र चव्हाण (११-१०-२०२२) : (१), (२) व (३) मौजे म्हसणे- सुलतानपुर येथील जनसेवा महिला बचत गटाने केलेल्या धान्याची अफरातफर व अनियमितता या विरोधात मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे रिट पिटिशन क्र.१०७४/२०२१ दाखल केली होती. दरम्यानच्या चौकशीमध्ये २४ मयत लाभार्थ्यांपैकी ६ मयत लाभार्थ्यांच्या कुटूबांतील सदस्यांनी दिलेल्या जबाबात त्यांच्या कुटूंबातील कोणाचीही स्वाक्षरी नसल्याचे जिल्हा पुरवठा अधिकारी, अहमदनगर यांनी स्पष्ट केले आहे. त्यानुसार जनसेवा महिला बचत गटाविरूध्द जिवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ चे कलम ३ व ७ नुसार स्थानिक पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(४) जनसेवा महिला बचत गटाने प्राधिकार पत्रातील महाराष्ट्र अनुसुचित वस्तु वितरणाचे विनियमन आदेश, १९७५ मधील तरतूदीचा भंग केल्याने त्यांचा परवाना जिल्हा पुरवठा अधिकारी, अहमदनगर यांनी रद्द करून सदर रास्तभाव दुकानास जोडण्यात आलेल्या शिधापत्रिका तात्पुरत्या स्वरूपात धान्य वितरणासाठी मौजे रायतळे येथील महालक्ष्मी बचत गटास जोडण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

ओणनवसे, नवसे, भाटी व देर्दे (ता.दापोली जि.रत्नागिरी) या गावांमधील पाणी टंचाईबाबत

(३६) ४५४६९ (१७-०९-२०२२). श्री.योगेशदादा कदम (दापोली), श्री.राजन साळवी (राजापूर) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्हयातील २४,२४४ लोकांना पाणी टंचाईची झळ बसत असून रत्नागिरी, राजापूर, गुहागर तसेच दापोली तालुक्यातील ओणनवसे, नवसे, भाटी, देर्दे या गावांत भीषण पाणी टंचाई निर्माण झाली असल्याने पाण्याच्या टँकरची मागणी करण्यात येत असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, टँकरने करण्यात येणारा पाणी पुरवठा अपुरा पडत असल्याने येथील डोंगर-खो-यात वसलेल्या धगनरवाडयांतील नागरीकांना पाण्यासाठी वणवण फिरावे लागत असल्याने टंचाईग्रस्त गावांकरिता पंचनदी धरणावरुन

पिण्याच्या पाण्याची योजना राबविण्याची मागणी ग्रामस्थांनी केली असून याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १६/६/२०२१ रोजी व त्यानंतर अनेक वेळा मा.पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री यांचेकडे पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त पत्राच्या अनुषंगाने उक्त गावांकरिता पिण्याच्या पाण्याची योजना राबविण्यासंदर्भात सुरु असलेली सर्वेक्षण व अंदाजपत्रके तयार करण्याची कार्यवाही पुर्ण झाली आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गुलाबराव पाटील (१९-१०-२०२२) :(१) रत्नागिरी जिल्हयात मे, २०२२ मध्ये टंचाई निर्माण झालेली होती. तथापि, रत्नागिरी, राजापूर, गुहागर तसेच दापोली तालुक्यात टँकरची मागणी करण्यात आलेली नाही.

(२) हे खरे आहे.

(३) जलजीवन मिशन योजनेअंतर्गत ओणनवसे, ओणी, भाटी या गावांचे सर्वेक्षण व अंदाजपत्रके तयार करण्यात आलेली असून ओणनवसे, ओणी, भाटी येथील कामाची निविदा प्रक्रीया सुरु आहे.

नवसे व देर्दे या गावांचे सर्वेक्षण व अंदाजपत्रके तयार करण्याचे काम झालेले असून देर्द ग्रामपंचायतीकडून निविदा प्रक्रीया सुरु आहे. नवसे ग्रामपंचायतीकडून कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

भोसे व आंधळगाव (ता. मंगळवेढा, जि.सोलापूर) पाणी पुरवठा योजना बंद असल्याबाबत

(३७) ४५७४७ (१७-०९-२०२२). श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोसे व आंधळगाव (ता. मंगळवेढा, जि.सोलापूर) पाणी पुरवठा योजना बंद असल्याने ग्रामस्थांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू योजना त्वरित सुरु करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (मंगळवेढा) यांनी लेखी पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीनुसार ही योजना सुरू करून ग्रामस्थांची गैरसोय दूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. गुलाबराव पाटील (२०-०९-२०२२) : (१) अंशत: खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) भोसे प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनचे रु. १०९.३६ लक्ष एवढे विद्युत देयक प्रलंबित असल्यामुळे दिनांक १८.०६.२०२१ रोजी विद्युत जोडणी महावितरण कंपनीने तोडली आहे. ग्रामपंचायतीकडून पाणीपट्टी वसुलीबाबत ४० गावांच्या बैठक घेण्यात आल्या आहेत. सदर ग्रामपंचायतीकडून पाणीपट्टी वसुल करणेबाबतची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

आंधळगाव प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेतील समाविष्ट ११ गावांपैकी केवळ (१) आंधळगाव व (२) लक्ष्मी दहिवडी या दोन गावांनी योजनेतून पाणी पुरवठा करणेची मागणी केलेली आहे. तसेच मंगळवेढा शहरानजीकचे संत चोखामेळा व संत दामाजीनगर या दोन गावांनी योजनेतून पाणी पुरवठ्याची मागणी केलेली आहे. त्यामुळे प्रादेशिक वरील योजनेतून ४ गावांची मागणी आहे.

आंधळगाव प्रादेशिक योजनेतून सुधारणात्मक पुनर्जोडणीचे काम करणेकरिता जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत रु. १२.१४ कोटीची दुरुस्ती अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरणमार्फत प्रस्तावीत असून, सदर योजनेस सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या स्तरावरील तांत्रिक छाननी उप समितीची काही अटीच्या अधीन राहून तत्वत: मान्यता

प्राप्त झाली आहे. सदर अंदाजपत्रकास तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्राप्त करून घेऊन प्रत्यक्ष अंमलबजावणी करणेची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

लोणार (जि.बुलढाणा) तालुक्यातील पाणी टंचाई दूर करण्यासाठी निधी मिळण्याबाबत

(३८) ४५९१३ (१७-०९-२०२२). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लोणार (जि.बुलढाणा) तालुक्यात गतवर्षी निर्माण झालेली पाणी टंचाई दूर करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने सादर केलेल्या कृती आराखड्यानुसार अद्यापपर्यंत ५ कोटी ६४ लक्ष ७१ हजार कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला नसल्याचे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे यंदाच्या उन्हाळयात पाणी टंचाई दूर करण्याकरिता खासगी विहिरींचे अधिग्रहण करता आले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरचे अनुदान प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत तसेच याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

श्री. गुलाबराव पाटील (१४-१०-२०२२) : (१) हे खरे नाही,
गतवर्षी पाणी टंचाई कार्यक्रमांतर्गत एकूण ७००.१४ लक्ष निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.
(२) हे खरे नाही,
यंदाच्या पाणी टंचाई वर्षात लोणार तालुक्यात २६ गावांमध्ये एकूण ३६ विहिरी अधिग्रहण करण्यात आल्या आहेत.
(३) पाणी टंचाई निवारणार्थ पंचायत समिती, लोणार अंतर्गत माहे ऑक्टोबर, २०२१ ते जुलै, २०२२ या कालावधीत अधिग्रहीत करण्यात आलेल्या कोणत्याही विहिर मालकाचे माहे ऑक्टोबर, २०२० ते जुलै, २०२१ या कालावधीतील देयक प्रलंबित नाही.

मुक्ताईनगर येथील १६० गावांना डार्क झोनमधून वगळण्यासाठी नव्याने भूजल सर्वेक्षण करुन भूजल मूल्यांकन ठरविणेबाबत

(३९) ४६०८९ (१७-०९-२०२२). श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुक्ताईनगर (जि.जळगाव) येथील १६० गावांना डार्क झोनमधून वगळण्याबाबत नव्याने भूजल सर्वेक्षण करुन भूजल मूल्यांकन ठरविणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदन मा. मुख्यमंत्री महोदयांना देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, त्यांचे स्वरुप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गुलाबराव पाटील (१४-१०-२०२२) : (१) “मुक्ताईनगर येथील १६० गावांना डार्क झोनमधून वगळण्यासाठी नव्याने भूजल सर्वेक्षण करून भूजल मुल्यांकन ठरविणेबाबत” अशा आशयाचे स्थानिक लोकप्रतिनिधींचे निवेदन प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
तथापि, केंद्रीय भूजल मंडळाने तयार केलेल्या भूजल अंदाज समिती २०१५ च्या कार्यप्रणालीनुसार राज्य शासनाच्या भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा व केंद्रीय भूजल मंडळ यांच्या सहकार्याने संयुक्तपणे सर्वेक्षणानुसार भूजल मुल्यांकनाची कार्यवाही केली जाते. सन २०२१-२०२२ या जलवर्षाचा (जून ते मे) भूजल अंदाज अहवाल-२०२२ उपलब्ध माहितीच्या आधारे तयार करण्यात आला आहे. सदर अहवाल केंद्र शासनाच्या मान्यतेस्तव सादर केला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात मॅक्सीकॅबच्या संदर्भात नियुक्त करण्यात आलेल्या समितीबाबत

(४०) ४६३९१ (१७-०९-२०२२). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मॅक्सीकॅबच्या संदर्भात ५ सदस्यांची समिती नियुक्त करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समितीचे सदस्य व अध्यक्ष कोण आहेत तसेच सदर समितीच्या कार्यकक्षा काय आहेत,

(३) असल्यास, सदर समितीचा अहवाल शासनास केव्हापर्यंत प्राप्त होणे अपेक्षित आहे ?

श्री. एकनाथ शिंदे (११-१०-२०२२) : (१) होय.

मॅक्सी कॅब वाहनांना परवाने देणेबाबत दि.०५.०५.२०२२ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे समिती गठीत करण्यात आली आहे.

(२) सदर समितीचे अध्यक्ष व सदस्यांची नावे पुढीलप्रमाणे आहेत.

अ.क्र.	नाव	पदनाम
१	श्री.रमानाथ झा (सेवानिवृत्त भा.प्र.से)	अध्यक्ष
२	डॉ.अविनाश ढाकणे,परिवहन आयुक्त	सदस्य
३	श्री.शेखर चन्ने,उपाध्यक्ष,महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ	सदस्य
४	श्री.जितेंद्र पाटील,अपर परिवहन आयुक्त (अ.का.)	सदस्य
५	श्री.अभय देशपांडे,परिवहन उप आयुक्त (अंमल-२)	सदस्य सचिव

समितीची कार्यकक्षा :- सदर समितीने मॅक्सी कॅब वाहनांना परवाने देण्याबाबत योजना तयार करतांना प्रवाशांची सोय, सुरक्षितता, वाहनाच्या कराचा दर, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे महसूलावर संभाव्य परिणाम, या वाहनांकडून शासनास प्राप्त होणारा महसूल व त्या वाहनांना द्यावयाचे क्षेत्र/मार्ग, परवाना संख्या व तदनुषंगीक इतर बाबींचा अभ्यास करून शिफारशीसह त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करणे.

(३) राज्यात मॅक्सी कॅब वाहनांना परवाने देण्याबाबत समितीच्या पाच बैठका घेण्यात आल्या असून अहवाल अंतिम करण्याची कार्यवाही सुरु आहे.

गोंदिया जिल्हयातील पाणी टंचाईबाबत

(४१) ४६६४३ (१७-०९-२०२२). श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्हयात पाण्याची उपलब्धता व टंचाई बाबतचे सर्वेक्षण प्रत्येक वर्षी पावसाळा संपल्यानंतर माहे ऑक्टोबर महिन्यातच घेऊन तसा जिल्हयाचा आराखडा जिल्हा स्तरीय समितीस सादर करणे, त्यानुसार उपाययोजना तयार करणे व आवश्यकता भासल्यास माहे मार्च-एप्रिलमध्ये पुरक आराखडा तयार करणे या शासनाच्या धोरणाची अंमलबजावणी होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १ एप्रिल, २०२२ रोजी पाणी टंचाईच्या आराखडयाबाबत सडक अर्जुनी तालुक्यात लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत बैठक घेण्यात आली तसेच जुन्या बोअरवेलची दुरुस्ती व नवीन बोअरवेल तयार करणेबाबतचा आराखडा तालुका स्तरावर तयार करुन जिल्हास्तरीय समितीकडे सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर आराखडा सादर करण्यात येऊनही माहे मे, २०२२ अखेरपर्यंत त्यास मान्यता प्राप्त न झाल्यामुळे जुन्या बोअरवेलची दुरुस्ती व नवीन बोअरवेलचे काम अद्याप सुरु करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उपरोक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

श्री. गुलाबराव पाटील (१९-१०-२०२२) : (१) हे खरे नाही
(२) पाणी टंचाई २०२१-२२ अंतर्गत तालुका स्तरावरील सभांचे आयोजन करुन त्यानुसार संकलित केलेल्या तालुक्यांच्या आराखडयास जिल्हयाचा एकत्रित आराखडा म्हणून जिल्हाधिकारी, गोंदिया यांनी दि. ५/५/२०२२ रोजी मान्यता दिली आहे.
(३) हे खरे नाही.
पाणी टंचाई आराखडयास दिलेल्या मंजुरीनुसार एकूण ७१९गावे/वाडयांमध्ये १६८३ उपाय योजनांचा अपेक्षित खर्च रु. ८३५.०६ लक्ष इतका आहे. प्रस्तावित आराखडयातील सर्वेक्षणाची कामे हाती घेऊन सडक/अर्जुनी व अर्जुनी मोर तालुक्यामधील ४९ नविन विंधन विहीरी व १४९ विंधन विहिरींचे विशेष दुरुस्तीची कामे मंजूर असून, त्यापैकी ४६ विंधन विहिरींची कामे पुर्ण करण्यात आली आहेत. तसेच १३० विंधन विहीरींची विशेष दुरुस्तीची कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत. उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही

मुंबईतील ३५-ई शिधावाटप दुकानात धान्य पुरवठा करणाऱ्या कंत्राटदारावर कारवाई करण्याबाबत

(४२) ४६७४१ (०७-०७-२०२२). श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील ३५-ई या शिधावाटप विभागात मे शिरीष कार्गो या वाहतुक कंत्राटदारास वितरणाचे कंत्राट दिले आहे, हे खर आहे काय,
(२) असल्यास, या कंत्राटदाराच्या विरोधात शिधावाटप दुकानदार व स्थानिक लोकप्रतिनिधीनी लेखी तक्रार केली होती, हे ही खर आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रविंद्र चव्हाण (१९-०९-२०२२) :(१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) प्रस्तुत प्रकरणी प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने वाहतूक कंत्राटदार मे. शिरिष कार्गो यांना कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली. तसेच ३५ ई या शिधावाटप क्षेत्रातील ३७ प्राधिकारधारकांपैकी १६ प्राधिकारधारकांनी वाहतूकदार हमाली घेत असल्याबाबत सादर केलेल्या निवेदनानुसार नियंत्रक, शिधावाटप यांच्या स्तरावर सुनावणी घेण्यात आली. सदर १६ प्राधिकारधारकांपैकी केवळ ३ प्राधिकारधारक उपस्थित राहिले व त्यांनी लेखी निवेदनाद्वारे, वाहतूक कंत्राटदार मे. शिरिष कार्गो यांच्याबाबत कोणतीही तक्रार नसल्याचे नमूद केले आहे. उर्वरित १३ प्राधिकारधारकांनी सुनावणीस उपस्थित राहून त्यांच्या तक्रारींबाबत खुलासा करणे अपेक्षित होते परंतु त्यांनी तसे केलेले नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे नांदप (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील पाणी टंचाईबाबत

(४३) ४६७५५ (१७-०९-२०२२). श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे नांदप (ता.कल्याण, जि.ठाणे) येथे गत माहे एप्रिल व जून महिन्यात पाणी टंचाई निर्माण झाल्याने नागरिकांची पाण्याची गैरसोय होत असल्याचे दिनांक १ जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रायता व १४ गाव पाणीपुरवठा योजनेमध्ये सदर गावांचा समावेश करण्यात आला असून येथे जल वाहिन्या व वितरण व्यवस्था करण्याबाबतचे अंदाज पत्रक शासन स्तरावर मंजुरीसाठी प्रलंबित असल्याने सदर योजनेचे काम प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार नांदप येथील प्रलंबित पाणी पुरवठा योजना तात्काळ पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गुलाबराव पाटील (१२-१०-२०२२) : (१) हे खरे नाही
(२) मौजे नांदप (ता. कल्याण, जि. ठाणे) या गावाचा रायता व १४ गावे पाणी पुरवठा योजनांमध्ये समावेश करण्यात आला आहे हे खरे आहे.
(३) रायता व १४ गांवे पाणी पुरवठा योजनेस शासनाने प्रशासकीय मान्यता दिली असून सदर योजनेच्या कामाचे कार्यादेश दिनांक ०८.०७.२०२२ रोजी देण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

संत जनाबाई जन्मस्थळ (तर.गंगाखेड, जि.परभणी) तीर्थक्षेत्रास पर्यटन क्षेत्र घोषित करून विकास कामांना निधी मिळण्याबाबत

(४४) ४६७६९ (१७-०९-२०२२). श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड) : सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोदावरी नदीच्या काठावर वसलेले गंगाखेड (जि.परभरणी) हे शहर श्री संत जनाबाई यांच्या जन्माने पावन झालेले शहर असून यास प्रती दक्षिण काशी नावाने ओळखले जाते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ५० वर्षांपासून हे तीर्थक्षेत्र असूनही पर्यटन क्षेत्र म्हणून घोषित झाले नसल्यामुळे विविध विकास कामे करण्यास अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, येथे शेकडो भाविक रोज येत असून त्यांची राहण्याची व इतर गैरसोई होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधी (गंगाखेड) यांनी दि.६.१.२०२२ रोजी मा.उपमुख्यमंत्री यांना निवेदनाद्वारे उक्तक्षेत्र पर्यटन क्षेत्र म्हणून घोषित करण्याची मागणी करून निधी उपलब्ध करण्याची विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. मंगलप्रभात लोढा (११-१०-२०२२) : (१), (२) व (३) होय.
(४) होय.
(५) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय, दि.१६.०१.२०१२ नुसार जिल्हयातील ठिकाणांची "क" वर्ग पर्यटनस्थळ म्हणून अंतिम निवड करण्यासाठी जिल्हा नियोजन समितीला शिफारस करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील पर्यटनस्थळे निवड समितीस देण्यात आले आहेत. यानुसार प्राप्त झालेले निवेदन जिल्हाधिकारी, परभणी यांना उचित कार्यवाहीसाठी पाठविण्यात आले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील सांस्कृतिक हस्तलिखितांचे जतन करण्याबाबत

(४५) ४६८८२ (१७-०९-२०२२). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे) :सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात सुमारे ३ हजार ४१४ हस्तलिखिते संरक्षण आणि संवर्धनाविना पडून असल्याचे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विद्यापीठात हिंदी, मराठी, संस्कृत, पंजाबी भाषेतील तसेच मोडी, सकल, सुंदरी, अंक, सुभ्रदा या लिपीतील अनेक कागदपत्रे उपलब्ध असून काही कागदांवरील अक्षरे धुसर होऊ लागली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या राष्ट्रीय सांस्कृतिक हस्तलिखितांचे संरक्षण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (१४-१०-२०२२) : (१) हे खरे नाही.
(२) विद्यापीठात हिंदी, मराठी, संस्कृत, पंजाबी भाषेतील तसेच मोडी, सकल, सुंदरी, अंक, सुभ्रदा या लिपीतील कागदपत्रे उपलब्ध असून सर्व हस्तलिखीते शास्त्रोक्त पध्दतीने वर्गीकृत केली असून विषयनिहाय बुक-केसमध्ये स्वतंत्ररित्या व व्यवस्थीतरित्या जतन केलेली आहेत. दुर्मिळ हस्तलिखीतांची संशोधकांना सेवा पुरविण्यासाठी सकल लिपीतील जाणकार नियुक्त केला आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

खामगाव, नांदुरा व मलकापुर (जिल्हा बुलढाणा) येथे अवैध बायोडिझेलची विक्री होत असल्याबाबत

(४६) ४७७०५ (१६-०९-२०२२). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खामगाव (जिल्हा बुलढाणा) येथे बायोडिझल पंप निर्मितीसाठी प्रस्ताव दाखल करणाऱ्या २५ पैकी केवळ तिघांनी अटी व शर्तीची पूर्तता केली असणे, उर्वरित २२ पंपांना जिल्हाधिकाऱ्यांकडून कोणताही परवाना नसताना त्यांच्याकडून बायोडिझेलची अवैध विक्री सुरु असून त्यामध्ये प्रामुख्याने नांदुरा व मलकापुर (जिल्हा बुलढाणा) येथील राष्ट्रीय महामार्गावर असलेल्या हॉटेल व गावांचा समावेश असल्याचे माहे जून, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने अवैध बायोडिझेलची विक्री थांबवून संबंधित दोषींवर जिल्हा प्रशासनामार्फत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रविंद्र चव्हाण (१३-१०-२०२२) : (१) होय, अशंत: खरे आहे.
बुलढाणा जिल्हयातील बायोडिझेल किरकोळ विक्रीसाठीचे ४ प्रस्ताव शासनास पूर्वमंजूरीसाठी प्राप्त झाले आहेत. तथापि, सदर प्रस्ताव हे शासन निर्णय दि.११ मे, २०२१ मधील निकषांनुसार परिपूर्ण नसल्यामुळे त्यांना अद्याप पूर्वमंजूरी देण्यात आलेली नाही. बुलढाणा जिल्हयातील मलकापूर व नांदुरा तालुक्यामध्ये काही ठिकाणी अवैध बायोडिझेलची विक्री सुरु असल्याचे निदर्शनास आले होते.
(२) जिल्हाधिकारी, बुलढाणा यांनी स्थापन केलेल्या पथकामार्फत मलकापूर तालुक्यामध्ये ९ अवैध विक्री केंद्र व नांदुरा तालुक्यामध्ये ११ अवैध विक्री केंद्र सील करण्यात आली आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

खानापूर, आटपाडी व तासगांव (जि.सांगली) तालुक्यात पर्यटन स्थळांना प्रादेशिक पर्यटन विकास योजनेमधून निधी मिळण्याबाबत

(४७) ४७७५३ (१७-०९-२०२२). श्री.अनिल बाबर (खानापूर) : सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खानापूर, आटपाडी व तासगांव (जि.सांगली) तालुक्यात पर्यटन स्थळांना प्रादेशिक पर्यटन विकास योजनेमधून निधी मिळण्याकरिता लोकप्रतिनिधिंनी दि.२२/१/२०२२ रोजी मा.मुख्यमंत्री व मा.पर्यटन मंत्रीमहोदयांकडे पत्रव्यवहार केला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पत्राच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत.

श्री. मंगलप्रभात लोढा (११-१०-२०२२) :(१) या संदर्भात मा. लोकप्रतिनिधींचे दि.१०.०५.२०२२ चे निवेदन प्राप्त झाले आहे.
(२) सदर निवेदनासंदर्भात संचालक, पर्यटन संचालनालय यांच्याकडून प्रस्ताव मागविण्यात आला आहे
(३) प्रश्न उद्भवत नाही.

ओला, उबरसह इतर १० ॲप आधारीत टॅक्सी सेवा देणाऱ्या कंपन्यांकरिता नवीन कायदा मंजूर करुन अमंलबजावणी करण्याबाबत

(४८) ४७९०४ (१७-०९-२०२२). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात ओला, उबर आणि इतर १० ॲप आधारीत टॅक्सी सेवा देणाऱ्या कंपन्यांना राज्य शासनाने दि.५.४.२०२२ रोजीच्या सुमारास तात्पुरते परवाने दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त तात्पुरत्या परवान्यांचे स्वरुप काय आहे, त्यामध्ये ग्राहकांच्या तक्रारी निवारण करणे व ग्राहकांच्या सुरक्षेबाबत कोणत्या तरतुदी करण्यात आल्या आहेत,
(३) तसेच, शासनाने याबाबत नवा कायदा मंजूर करुन त्याची तात्काळ अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (११-१०-२०२२) : (१) दिनांक ०५.०४.२०२२ रोजीच्या काही वृत्तपत्रांत "ओला,उबेर टॅक्सी कंपन्यांना परवाने" या शिर्षकाच्या बातम्या प्रसिध्द झाल्या होत्या. एकूण १७ समुच्च्यकांना अनुज्ञप्ती जारी करण्यात आली आहे.
(२) मा.मुंबई उच्च न्यायालयाचे दिनांक ०७.०३.२०२२ रोजीच्या आदेशानुसार ॲप आधारीत टॅक्सीला परवाना संबंधीत प्रादेशिक परिवहन प्राधिकरण (RTA) कडून दिला जातो. अशाप्रकारे समुच्चयकाद्वारे चालविण्यात येणाऱ्या व्यवसायावर नियमन, नियंत्रण व परवाने जारी करण्यास केंद्र शासनाने दि. २७.११.२०२० अन्वये 'Motor Vehicle Aggregators Guidelines, २०२० मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. सदर मार्गदर्शक सूचनांमध्ये नियम ९ च्या उपनियम (१०)(१२) मध्ये ग्राहकांच्या तक्रार निवारण करण्याबाबत व नियम १० मध्ये ग्राहकांच्या सुरक्षेबाबत तरतुदी करण्यात आल्या आहेत.
(३) याबाबत मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये स्पेशल लिव्ह पिटिशन (सी) क्र.५७०५/२०२२ दाखल असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई व ठाण्यातील अंत्योदय लाभार्थ्यांच्या धान्याची काळ्या बाजारात विक्री होत असल्याबाबत

(४९) ४७९६९ (१६-०९-२०२२). श्री.योगेश सागर (चारकोप) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई व ठाण्यातील अनेक रेशन दुकानदार अंत्योदय योजनेतील लाभार्थींना धान्य खरेदीची पावती न देता सदर धान्याची काळ्या बाजारात विक्री करुन लाभार्थ्यांची फसवणूक करीत असल्याचे रेशनींग कृती समितीने दिनांक १५ जून, २०२२ रोजी केलेल्या पाहणीत आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लाभार्थ्यांनी दोन ते तीन महीने धान्य न घेतल्यास त्यांचे रेशनकार्ड तात्पुरते निलंबित केले जाते, त्यामुळे प्रत्येक रेशन दुकानात सुमारे १० ते १५ टक्के रेशनकार्ड रद्द होत असल्याने लाभार्थी योजनेपासून वंचित रहात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रविंद्र चव्हाण (०४-१०-२०२२) : (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही. लाभार्थ्याने सलग ३ महिने शिधावाटप दुकानातून शिधावस्तुंची उचल न केल्यास त्यांचा समावेश NER वर्ग करण्याची प्रक्रिया केली जाते. तथापि, सदर शिधापत्रिकाधारक शिधापत्रिका तसेच, आवश्यक त्या कागदपत्रांसह शिधावाटप कार्यालयात उपस्थित राहिल्यास त्यांचा पुन्हा लाभार्थी यादीत समावेश केला जातो.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

नैसर्गिक आपत्ती निवारणार्थ सहाय निधीतुन बीड येथील विहीर बोअर अधिग्रहणाची देयके अदा करण्याबाबत

(५०) ४८०९८ (२०-०९-२०२२). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड येथील सन २०१८-१९ या टंचाई वर्षातील विहीर बोअर अधिग्रहणाच्या देयक अदायगीबाबत नैसर्गिक आपत्ती निवारणार्थ सहाय्य निधी (लेखाशिर्ष २२४५-२१८५) सन २०२१-२१ उपलब्ध करुन अदायगीच्या मान्यतेकरिता विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना दि.१९ जानेवारी, २०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मान्यतेच्या प्रस्तावाची छाननी करुन मान्यता प्रदान करण्याबाबत विभागीय आयुक्तांमार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गुलाबराव पाटील (१४-१०-२०२२) : (१) होय, हे खरे आहे
(२) सदर प्रस्ताव विभागीय आयुक्तामार्फत मान्यतेसाठी शासनास सादर करण्यात आला होता. तथापि शासन निर्णय वित्त विभाग दिनांक ०६.०६.२००८ नुसार ज्या आर्थिक वर्षात निधी मंजूर करण्यात आला आहे त्या आर्थिक वर्षाच्या लगतच्या पुढील आर्थिक वर्षअखेर पर्यंत खर्च करण्याची परवानगी देण्यात आलेली आहे.
तसेच ज्या टंचाई कालावधीतील टंचाई निवारणार्थ उपाययोजनांसाठी निधी वितरीत करण्यात आला आहे, त्याच टंचाई कालावधीतील उपाययोजनांचा खर्च भागविण्यासाठी निधी उपयोगात आणण्याबाबतच्या सूचना शासन निर्णय, दिनांक ३०.०३.२०२१ मध्ये आहे. त्यामुळे सन २०२०-२१ या आर्थिक वर्षामध्ये वितरीत करण्यात आलेला अखर्चित निधी सन २०१८-१९ या टंचाई वर्षातील विहीर देयक निधी खर्च करता येत नसल्याने सदर प्रस्ताव शासन स्तरावरून अमान्य करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उदभवत नाही

विधान भवन :
नागपूर.

राजेन्द्र भागवत
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.